**निओ फॉर बिझनेस इंटरनेट बँकिंग अटी व शर्ती:**

हे कागदपत्र इंटरनेट बँकिंगच्या अटी व शर्ती स्पष्ट करते. ज्या ॲक्सिस बँकेच्या 'निओ फॉर बिझनेस' वर यशस्वीरित्या नोंदणीकृत असलेल्या सर्व विद्यमान खात्यांना तसेच भविष्यात कोणत्याही वेळी नोंदणी केल्या जाणाऱ्या खात्यांना लागू असतील. इंटरनेट बँकिंग अटी व शर्ती हा वापरकर्ता (खाली परिभाषित केल्याप्रमाणे) आणि बँक दरम्यानचा करार आहे.

**व्याख्या**

या कागदपत्रांत, संदर्भ भिन्न काही दर्शवत नसल्यास, खाली नमूद केलेल्या शब्दांचे अर्थ त्यांच्या समोरील वर्णनाप्रमाणे समजावेत.

- "बँक" म्हणजे ॲक्सिस बँक लिमिटेड, कंपनीज अधिनियम 1956 अंतर्गत भारतात स्थापित बँकिंग कंपनी आणि त्याचे नोंदणीकृत कार्यालय "त्रिशूल", तिसरा मजला, समर्थेश्वर मंदिर, जवळ. लॉ गार्डन समोर, एलिसब्रिज, अहमदाबाद - 380 006, गुजरात, भारत, त्यातील कोणत्याही शाखा/कार्यालयासह. या संज्ञेमध्ये ॲक्सिस बँक लिमिटेडचे उत्तराधिकारी आणि नियुक्त व्यक्तींचा समावेश होतो.

- "ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग" ही बँकेची इंटरनेट सेवा आहे. जी वापरकर्त्याला खालील सुविधा प्रदान करते: बॅलन्स चौकशी, खात्याचे स्टेटमेंट, चेकबुक जारी करण्याची विनंती*, एकीकृत बिल, इन्व्हेंटरी मॅनेजमेंट, रिपोर्ट, विक्री आणि खरेदी मॉड्यूल्स, वेतन व्यवस्थापन*, कर भरणा* तसेच बँक वेळोवेळी उपलब्ध करून देईल अशा इतर सुविधा.

* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू

- "वापरकर्ता" म्हणजे असा कोणताही व्यक्ती/व्यक्तींचा समूह जो बँकेचा खातेधारक आहे किंवा एकमेव स्वाक्षरीकर्ता आहे किंवा एकापेक्षा अधिक स्वाक्षरीकर्ते असताना अधिकृत स्वाक्षरीकर्ता आहे आणि/किंवा बँकेद्वारे प्रदान करण्यात येणारी इंटरनेट बँकिंग सेवा वापरण्यास बँकेकडून अधिकृत केले आहे.
  "खाते" म्हणजे वापरकर्त्याचे आणि/किंवा चालू खाते आणि/किंवा मुदत ठेवी आणि/किंवा कॅश क्रेडिट खाते* आणि/किंवा डिपॉझिटरी खाते आणि/किंवा ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधेअंतर्गत कव्हर करण्यासाठी बँकेने नियुक्त केलेले इतर कोणतेही प्रकारचे खाते होय.

* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू

- "अटी" म्हणजे या कागदपत्रात सविस्तर नमूद केलेल्या ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगच्या वापरासाठी लागू असलेल्या अटी व शर्ती होय.

- "ग्राहक" किंवा "क्लायंट" किंवा "कंपनी" म्हणजे या अटी व शर्तीअंतर्गत इंटरनेट बँकिंग सेवांचा लाभ घेणारी व्यक्ती/संस्था. "इंटरनेट बँकिंग सेवा" किंवा "सेवा" जिथे या अटी व शर्तीमध्ये वापरल्या जातात. तिथे ॲक्सिस बँकद्वारे त्यांच्या ग्राहकांना निधी हस्तांतरण/पेमेंट सेवा (एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएस सुविधा), चेक*/डिमांड ड्राफ्ट*/पे ऑर्डर सुविधा*, वैधानिक आणि टॅक्स पेमेंट*, ट्रेड आणि फॉरेन एक्स्चेंज सेवा*, बिगर-वित्तीय सेवा* (चेक बुक, डीडी, पॅन अपडेट इ.) आणि वेळोवेळी उपलब्ध केलेल्या इतर कोणत्याही सेवांसह या अटी व शर्तीअंतर्गत ऑफर केलेल्या सेवांचा अर्थ असेल तसेच यामध्ये ॲक्सिस बँक वेळोवेळी करेल अशा या सेवांमधील सर्व सुधारणांचाही समावेश असेल. * बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू

- "सूचना" म्हणजे ग्राहकाने ॲक्सिस बँकेला या सेवांच्या अंतर्गत येणाऱ्या क्रियाकलापांसाठी सुरक्षा प्रक्रियेचे पालन करुन झालेले सर्व बोलणे किंवा दिलेल्या सूचना, ज्यामध्ये निधी पाठवण्यासाठी किंवा हस्तांतरण करण्यासाठी कोणत्याही पेमेंट सूचनांचा समावेश आहे.
- "ओटीपी" म्हणजे वन-टाइम पासवर्ड/वन-टाइम पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर.
- "आरबीआय" म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया.
- "एनपीसीआय" म्हणजे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया.

- "विनियम" किंवा "मार्गदर्शक तत्वे" म्हणजे सेवांशी संबंधित आरबीआय, एनपीसीआय किंवा इतर कोणत्याही सरकारी किंवा वैधानिक प्राधिकरणाने वेळोवेळी जारी केलेले सर्व नियम, विनियम आणि/किंवा मार्गदर्शक तत्वे.
- "सुरक्षा प्रक्रिया" म्हणजे सूचनेत सुधारणा करणारी किंवा रद्द करणारी सूचना किंवा घडलेला संवाद ग्राहकाचा आहे की नाही याची प्रक्रिया किंवा पडताळणी करण्याच्या उद्देशाने किंवा सूचनेमधील मजकुराच्या प्रसारणात त्रुटी शोधण्यासाठी ॲक्सिस बँकेने वेळोवेळी विहित केलेली अशी प्रक्रिया आहे.
- "अटी आणि शर्ती" म्हणजे येथे नमूद केल्याप्रमाणे, सुधारित आणि पूरक केल्या जाऊ शकणाऱ्या या अटी व शर्ती.
- “वापरकर्ता” म्हणजे ग्राहकाचे ते प्रतिनिधी ज्यांना इंटरनेट बँकिंगद्वारे ग्राहकाच्या खात्यांमध्ये प्रवेश करण्याचे अधिकार आहेत; यामध्ये केवळ माहिती पाहण्याचे अधिकार असलेले वापरकर्ते आणि माहिती भरणे, अपलोड करणे, पडताळणी, पुष्टीकरण आणि/किंवा अधिकृत करण्याचे अधिकार असलेल्या दोन्ही प्रकारच्या वापरकर्त्यांचा समावेश असेल. जेथे अशी अधिकृत मंजूरी, अधिकार ग्राहकाद्वारे संयुक्त आधारावर दिले जातात, तिथे या संज्ञेचा अर्थ संदर्भ किंवा अर्थ आवश्यक असल्यास, अधिकृत मंजूरी अधिकार असलेले संयुक्त वापरकर्ते असा होईल.
- "वेबसाईट/साईट" म्हणजे www.axisbank.com ही वेबसाईट किंवा अशा अन्य वेबसाईट ज्या ॲक्सिस बँकद्वारे वेळोवेळी सूचित केले जाऊ शकतात.
- "जीएसटी" म्हणजे वस्तू किंवा सेवांच्या पुरवठ्यावर किंवा जीएसटी कायद्यांतर्गत दोन्हीवर लादलेला कोणताही कर किंवा उपकर किंवा दोन्ही.
- "जीएसटीआयएन" म्हणजे वस्तू आणि सेवा कर ओळख नंबर
- "जीएसटीएन" म्हणजे वस्तू आणि सेवा कर नेटवर्क.
- जीएसटी कायदे" म्हणजे आयजीएसटी अधिनियम 2017, सीजीएसटी अधिनियम 2017, यूटीजीएसटी अधिनियम 2017 आणि राज्य विशिष्ट एसजीएसटी अधिनियम, 2017 आणि संबंधित कायद्यांतर्गत जारी केलेले सर्व संबंधित नियम, विनियम, अधिसूचना आणि परिपत्रके.
- “नो यूवर कस्टमर” किंवा “केवायसी” म्हणजे लागू असलेल्या कायद्यांनुसार विविध निकष, आदेश, नियम, नियमन, कायदे आणि उपविधी असा आहे, ज्यामध्ये वेळोवेळी जारी केलेल्या आरबीआय मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश आहे; ज्यानुसार निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्म वापरण्याची किंवा त्यात प्रवेश करण्याची इच्छा असलेल्या वापरकर्त्याकडून निओ फॉर बिझनेस त्यांची वैयक्तिक ओळख पटवणारी माहिती प्राप्त करते.
- “आरबीआय मार्गदर्शक तत्त्वे” म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेले प्रचलित नियम, नियमन, आदेश, निर्देश, अधिसूचना आणि मार्गदर्शक तत्त्वे असा आहे, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे परंतु त्यापुरतेच ते मर्यादित नाही - पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम्स ॲक्ट, 2007; 'निओ फॉर बिझनेस'च्या संचालनासाठी आरबीआयचे निर्देश; मध्यस्थांचा समावेश असलेल्या इलेक्ट्रॉनिक पेमेंट व्यवहारांच्या खात्यांचे संचालन आणि पेमेंट सेटलमेंट संबंधीचे दिनांक 24 नोव्हेंबर 2009 चे निर्देश; पेमेंट ॲग्रिगेटर्स आणि पेमेंट गेटवेच्या नियमनाबाबतची दिनांक 17 मार्च 2020 ची मार्गदर्शक तत्त्वे आणि 'नो युवर कस्टमर' संबंधी मास्टर डायरेक्शन्स, 2016; तसेच यांमध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सर्व सुधारणा.

“सेवा” याचा अर्थ आणि त्यामध्ये वापरकर्त्याच्या विनंतीनुसार निओ फॉर बिझनेसद्वारे वापरकर्त्याला प्रदान केलेल्या खालील सेवांचा समावेश होतो:

  - पेमेंट्स आणि संकलन साठी ऑनलाइन व्यवसाय खाते;
  - पेमेंट गेटवे
  - ऑटोमेटेड अकाउंटिंग;

- एकाधिक खात्यांची जोडणी;*
- टॅक्स भरणे;*
- क्यूआर कार्ड*
- व्हिसा को-ब्रँडेड कार्ड;*
- बिझनेस लोन्स;*
- ॲप्स - निओ फॉर बिझनेस टॅली+, * निओ फॉर बिझनेस स्टोअर, *निओ फॉर बिझनेस क्लास, *निओ फॉर बिझनेस सर्कल, *निओ फॉर बिझनेस हब, *निओ फॉर बिझनेस पेरोल इ.;* आणि/किंवा
- यामध्ये आमच्याद्वारे वेळोवेळी प्रदान केलेल्या इतर कोणत्याही उत्पादन/सेवांचा समावेश होतो.

"[* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू.]"

- "सेवा प्रदाता" म्हणजे "निओ फॉर बिझनेस" सुविधा प्रदाता, ज्याच्या सुविधा किंवा सेवा या सेवांच्या पुरवठ्यामध्ये वापरण्यात येतात.
- "व्यवहार" म्हणजे अशा पेमेंट सूचना, ज्याचा परिणाम संदर्भाच्या आवश्यकतेनुसार, (a) वापरकर्त्याकडून प्राप्तकर्त्याकडे; निधी यशस्वीरित्या हस्तांतरित होण्यात; किंवा (b) पैसे देणाऱ्याकडून वापरकर्त्याकडे निधी यशस्वीरित्या हस्तांतरित होण्यात.
- संदर्भाच्या आवश्यकतेनुसार, "वापरकर्ता", "तुम्ही" किंवा "तुमचे" आणि "स्वतः" या शब्दांचा अर्थ असा आहे की, कोणतीही व्यक्ती किंवा कायदेशीर संस्था (ज्यामध्ये वैयक्तिक मालकी संस्था, भागीदारी संस्था, कंपनी, मर्यादित दायित्व भागीदारी, ट्रस्ट, सोसायटी किंवा हिंदू अविभक्त कुटुंब यांचा समावेश होतो) ज्यांनी निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्मवर नोंदणी केली आहे किंवा जे या प्लॅटफॉर्मवरून व्यवहार करतात अथवा सेवा मिळवतात. "वापरकर्ता" या संज्ञेमध्ये वापरकर्त्याच्या अशा कर्मचारी वर्गाचा देखील समावेश असेल (ज्यामध्ये वापरकर्त्याचे कोणतेही वर्तमान किंवा माजी अधिकारी, संचालक किंवा कर्मचारी यांचा समावेश आहे परंतु तो त्यापुरतेच मर्यादित नाही), जे वापरकर्ता खात्याची क्रेडेंशियल्स वापरून, प्रकरणपरत्वे पूर्ण अधिकारांसह किंवा मर्यादित अधिकारांसह निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्मवर प्रवेश करतात

**भाग 1- ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगसाठी अर्ज अटींची लागूता**

या अटी वापरकर्ता व बँक यांच्यातील कराराचे स्वरूप धारण करतात. ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगसाठी अर्ज करून आणि सेवेचा वापर करून, वापरकर्ता या अटी मान्य करतो आणि स्वीकारतो. या अटी वापरकर्त्याच्या कोणत्याही खात्याशी संबंधित लागू असलेल्या अटी व शर्तींच्या अतिरिक्त असतील आणि त्यांना बाधा आणणाऱ्या नसतील.

बँकेकडे चालू खाते असलेल्या ग्राहकांनी निओ फॉर बिझनेसवर यशस्वी नोंदणी केल्यानंतर, त्यांना ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगची सुविधा उपलब्ध होईल; यासाठी ही सेवा सक्रिय करण्यासाठी कोणत्याही अतिरिक्त औपचारिकता पूर्ण करण्याची आवश्यकता नसेल, मात्र यासाठी प्राथमिक अर्जदाराचा मोबाईल नंबर विभाग 'D' (पत्ता तपशील) मध्ये नमूद असणे आवश्यक आहे. वापरकर्ता हा सध्याचा कायदेशीर इंटरनेट वापरकर्ता असणे किंवा त्याला इंटरनेटची उपलब्धता असणे आणि इंटरनेटच्या कार्यपद्धतीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तथापि, कोणत्याही वेळी बँक त्यांच्या विवेकबुद्धीनुसार काही ग्राहकांना ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधेला प्रतिबंधित करू शकते.

ज्या विद्यमान बँक ग्राहकाची इंटरनेट बँकिंगसाठी नोंदणी झालेली नाही, असे ग्राहक ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगचा नोंदणी अर्ज भरून बँकेच्या कोणत्याही शाखेत सादर करू शकतात. बँकेच्या विहित नमुन्यातील अर्ज मिळाल्यावर आणि बँकेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या पात्रतेच्या अटींची समाधानकारक पूर्तता झाल्यावरच, बँक स्वतःच्या निर्णयानुसार ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगची सुविधा उपलब्ध करून देईल. वापरकर्ता स्वतः किंवा इतरांच्या माध्यमातून, बँकेच्या संगणकांमध्ये साठवलेली आणि स्वतःच्या खात्याशी संबंधित नसलेली कोणतीही माहिती, ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग व्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने मिळवण्याचा प्रयत्न करणार नाही; किंवा बेकायदेशीर आणि अयोग्य कारणांसाठी त्याचा वापर करणार

नाही. असे केल्याचे सिद्ध झाल्यास, संबंधित कायद्यानुसार कारवाई केली जाईल आणि वापरकर्त्याला मिळणारी ही सुविधा काढून घेतली जाईल.

**सूचना**

ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधेच्या संचालनासाठी सर्व सूचना बँकद्वारे दर्शविलेल्या पद्धतीने इंटरनेटद्वारे वापरकर्त्याला दिल्या जातील. बँकेला प्रदान केलेल्या सूचनांच्या अचूकता आणि प्रामाणिकतेसाठी वापरकर्ता देखील जबाबदार आहे आणि ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधा ऑपरेट करण्यासाठी ते पुरेसे मानले जाईल. बँकेला प्राप्त झालेल्या सूचनांची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची आवश्यकता नसेल; एकदा दिलेली सूचना प्रभावी मानली जाईल, जोपर्यंत ती अल्प कालावधीत पुढील सूचनांद्वारे रद्द केली जात नाही. जर मूळ सूचनांची अंमलबजावणी थांबवण्यास किंवा रोखण्यास बँक असमर्थ ठरली किंवा बँकेने तसे केले नाही, तर त्याबद्दल बँक जबाबदार राहणार नाही. बँकेला जर प्राप्त झालेल्या सूचना विसंगत किंवा परस्परविरोधी वाटल्या, तर बँक वापरकर्त्याकडून स्पष्टीकरण मागवू शकते किंवा बँकेला योग्य वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही सूचनांनुसार कार्यवाही करू शकते.

- ग्राहकाकडून ॲक्सिस बँकेला प्राप्त झालेल्या सर्व सूचनांवर, त्या संबंधित सूचनांसाठी बँकेने निश्चित केलेल्या कालमर्यादेनुसार (टीएटी) प्रक्रिया केली जाईल. या अटी व शर्तींमध्ये नमूद केलेल्या पद्धतीने, येथे नमूद केलेल्या सुरक्षा प्रक्रियेचा वापर करून, जर सूचना ॲक्सिस बँकेला पाठवली गेली असेल तरच ॲक्सिस बँकेकडून ती स्वीकारली जाईल. ॲक्सिस बँक, तिच्या पूर्ण विवेकबुद्धीनुसार परंतु कोणत्याही बंधनाशिवाय, सूचनांच्या सत्यतेबद्दल पुढील तपासणी करू शकते.

- ॲक्सिस बँकेला प्रदान केलेल्या सूचनांच्या अचूकता आणि प्रामाणिकतेसाठी ग्राहक पूर्णपणे जबाबदार आहे आणि त्याद्वारे अधिकृत कोणत्याही वापरकर्त्याने दिलेल्या आणि/किंवा व्यवहारांना बांधील असेल. ॲक्सिस बँकेला ग्राहकाने दिलेल्या सर्व सूचनांवर अवलंबून राहण्याचा आणि अशा सूचनांवर कार्य करण्याचा अधिकार असेल. ग्राहक मान्य करतो आणि सहमत आहे की कोणत्याही माहिती आणि/किंवा सूचनेमध्ये अचूकतेचा अभाव असल्यास, त्यातून परिणामी चुकीचे हस्तांतरण होऊ शकतात. अशा सर्व सूचना अंतिम असतील आणि ग्राहकावर बंधनकारक असतील. ॲक्सिस बँकेला दिलेल्या प्रत्यक्ष सूचनांवर कोणतेही विवाद असल्यास, ॲक्सिस बँकेचे रेकॉर्ड अंतिम असतील आणि ग्राहकावर बंधनकारक असतील.

- ग्राहकाच्या पुढील सूचनांद्वारे रद्द केली जात नाही किंवा ॲक्सिस बँकेद्वारे अंमलात आणली जात नाही तोपर्यंत सूचना प्रभावी राहील. ग्राहकाला ॲक्सिस बँकेला पुरविलेल्या कोणत्याही माहितीमध्ये त्रुटी आढळल्यास, ती त्वरित ॲक्सिस बँकेला सूचित करावी आणि ॲक्सिस बँक "वाजवी प्रयत्नांच्या" आधारावर जिथे शक्य असेल तिथे त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करेल. इतर कोणत्याही व्यक्तीने केलेल्या चुकीमुळे ग्राहकाच्या खात्यात चुकून पैसे क्रेडिट झाल्यास, ग्राहक कोणत्याही वेळी चुकीने क्रेडिट झालेले रिव्हर्स करण्यासाठी ॲक्सिस बँकेला अधिकृत करतो. ग्राहकाला ॲक्सिस बँकेकडून मिळालेल्या कोणत्याही अनुचित किंवा अन्याय्य नफ्यासाठी तो जबाबदार असेल आणि तो यापुढेही जबाबदार राहील.

- जर ॲक्सिस बँकेचे असे मत असेल की (i) तिला मिळालेली सूचना ग्राहकाने योग्यरित्या अधिकृत केलेली नसेल तर; किंवा (ii) कोणत्याही कायद्याच्या किंवा धोरणाच्या विरुद्ध परस्परविरोधी, विसंगत, अस्पष्ट, अपूर्ण, कमतरतापूर्ण आहे, किंवा (iii) ॲक्सिस बँकेला असे मानण्याचे कारण आहे की ही सूचना बेकायदेशीर व्यवहार करण्यासाठी जारी केला गेली आहे; किंवा (iv) सदर सूचनेसोबत कोणत्याही विशेष परिस्थितीची सूचना जोडलेली असल्यास, (v) खात्यात अपुरी रक्कम असल्यास किंवा स्पष्ट निधी उपलब्ध नसल्यास; ॲक्सिस बँक, (तसे करण्यास बांधील नसताना) अशा कोणत्याही सूचनांवर किंवा कृतीवर कारवाई करण्यापूर्वी ग्राहकाकडून स्पष्टीकरण मागू शकते किंवा तिला योग्य वाटेल त्या पद्धतीने अशा कोणत्याही सूचनांवर कारवाई करू शकते किंवा करण्यास नकार देऊ शकते. वरील परिस्थितीत कोणत्याही सूचना पूर्ण करण्यास किंवा अंमलात आणण्यास नकार देण्यामुळे किंवा कोणत्याही सूचना लागू करण्यात झालेल्या  विलंबामुळे ग्राहकाला किंवा कोणत्याही तृतीय पक्षाला झालेल्या कोणत्याही नुकसानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.

- आपल्या वाजवी नियंत्रणाबाहेरच्या कोणत्याही परिस्थितीमुळे किंवा कायद्याच्या कोणत्याही आवश्यकतांमुळे

किंवा कोणत्याही तृतीय पक्ष, विक्रेता आणि/किंवा भागीदाराने केलेल्या कोणत्याही कमतरतेमुळे, कोणत्याही कारणास्तव सूचना अंमलात आणण्यात येणाऱ्या कोणत्याही विलंबासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

- जर आवश्यक कागदपत्रांमुळे प्रभावित होत नसेल तर कोणत्याही सूचना लागू करणे शक्य नसेल, तर ॲक्सिस बँकेला अशी कागदपत्रे प्राप्त होईपर्यंत अशा सूचनांवर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.
- निधीच्या कमतरतेमुळे आणि/किंवा कोणत्याही सरकारी संस्थेकडून किंवा वैधानिक प्राधिकरणाकडून मिळालेला कोणताही आदेश, मार्गदर्शक तत्वे किंवा निर्देश यामुळे सूचनांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही
- ग्राहकाने दिलेल्या सूचनांनुसार इंटरनेट बँकिंग चॅनेलमध्ये व्यवहार प्रक्रिया नियम आणि मर्यादा तयार केल्या जातील. इंटरनेट बँकिंगवर व्यवहार सुरू करण्याची आणि मंजूर करण्याची जबाबदारी ग्राहकाची आहे आणि सुविधेचा गैरवापर/अनधिकृत वापर किंवा वापरकर्त्यांकडून ॲक्सेस क्रेडेन्शियल्सशी तडजोड झाल्यामुळे उद्भवलेल्या कोणत्याही अनपेक्षित परिणामांसाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.
- ग्राहकाने केलेल्या कोणत्याही विदेशी चलन व्यवहाराशी संबंधित कोणत्याही सूचनेच्या बाबतीत, ॲक्सिस बँकद्वारे कोट केलेले विनिमय दर, जर असल्यास (त्याच्या वेबसाईटद्वारे किंवा अन्यथा) केवळ तात्पुरते असतील आणि भविष्यातील विनिमय दरातील बदलांच्या अधीन असतील. ज्या दराने व्यवहार प्रभावी केला जातो तो सर्व हेतू आणि उद्देशांसाठी प्रभावी दर असेल. ग्राहकाने दिलेल्या कोणत्याही सूचना लागू असलेल्या कायद्यांच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या नसाव्यात; यामध्ये परकीय चलन व्यवस्थापन कायदा, 1999 अंतर्गत तयार केलेले विविध नियम, भारतीय रिझर्व्ह बँक, किंवा इतर कोणतीही सरकारी संस्था किंवा वैधानिक प्राधिकरणाने घालून दिलेले नियम व नियमावली यांचा समावेश आहे, परंतु त्यापुरतेच मर्यादित नाही*. *बँकेद्वारे या प्लॅटफॉर्मवर या सेवा ज्या वेळी सादर केल्या जातील, त्या वेळी लागू राहील
- जर ग्राहक/वापरकर्त्याने नोंदणीकृत वापरकर्ता आयडी वापरून इंटरनेट बँकिंग सेवांचा ॲक्सेस करण्यासाठी नियुक्त प्लॅटफॉर्मद्वारे अशा ग्राहक/वापरकर्ता अंतिम लॉग-इन केल्याच्या तारखेपासून 365 (तीनशे पासष्ट) [कॅलेंडर दिवस] च्या निरंतर कालावधीसाठी नोंदणीकृत वापरकर्ता आयडीद्वारे व्यवसायासाठी ॲक्सिस निओमध्ये लॉग-इन केले नसेल तर ॲक्सिस बँक कोणतेही ग्राहक/वापरकर्ता/वापरकर्ता आयडी "निष्क्रिय वापरकर्ता" म्हणून वर्गीकृत/चिन्हांकित/वर्गीकृत करू शकते. अशा प्रकारे कोणत्याही ग्राहकाचे/वापरकर्त्याचे किंवा वापरकर्ता आयडीचे 'अक्षम वापरकर्ता' म्हणून वर्गीकरण किंवा चिन्हांकन केल्यानंतर, तो ग्राहक/वापरकर्ता ॲक्सिस निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्मवर संबंधित ॲक्सिस आयडी पुन्हा सक्रिय केल्याशिवाय कोणत्याही सेवांचा लाभ घेऊ शकणार नाही. निष्क्रिय/अक्षम वापरकर्ता आयडी पुन्हा सक्रिय करण्यासाठी, संबंधित ग्राहक (अधिकृत स्वाक्षरीकर्त्याद्वारे)/वापरकर्ता 'आयडी सक्षम करा' टॅबवर क्लिक करू शकतो; त्यानंतर वापरकर्ता आयडीच्या तपशिलांची पडताळणी आणि यशस्वी प्रमाणीकरण पूर्ण केल्यावर, वापरकर्ता नवीन पासवर्ड तयार करू शकतो, ज्याचा वापर लॉग-इनसाठी करता येईल. कोणत्याही कारणामुळे एखाद्या वापरकर्त्याचे खाते निष्क्रिय म्हणून वर्गीकृत किंवा चिन्हांकित केले गेल्यास, अशा वापरकर्त्यांना निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्मवर प्रवेश करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**सेवा**

- या अटी व शर्तींच्या अधीन, लागू कायदे आणि ॲक्सिस बँकच्या वेबसाईटवर नमूद केलेल्या इतर अटी व शर्तींच्या अधीन राहून, ॲक्सिस बँक ग्राहकांना सेवा प्रदान करेल. ॲक्सिस बँकेला वेळोवेळी सेवांमध्ये बदल करण्याचा, अपग्रेड करण्याचा आणि/किंवा सेवा स्थगित करण्याचा, तसेच सेवांची पद्धत आणि व्याप्ती बदलण्याचा अधिकार असेल; आणि अशा बदलांविषयी ग्राहकाला सूचित करण्याचा बँक प्रयत्न करेल. ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता आणि त्यामुळे कोणतेही कारण न देता त्यांना प्रदान केलेल्या सर्व किंवा कोणत्याही सेवा निलंबित करण्याचा अधिकार बँककडे राखीव आहेत.

- सेवांचा किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचा लाभ घेण्यासाठी किंवा त्यांचा लाभ घेणे बंद करण्यासाठी, ग्राहकाने विहित नमुन्यात ॲक्सिस बँकेकडे स्वतंत्र अर्ज करावा आणि ग्राहक या उद्देशासाठी ॲक्सिस बँकेने विहित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्तींद्वारे नियंत्रित असेल, तसेच लागू कायद्यांच्या अधीन असेल.

- ॲक्सिस बँक, ग्राहकाच्या विनंतीनुसार, इतर कोणत्याही विद्यमान किंवा नवीन खात्यांसाठी या सेवांचा विस्तार करू शकते आणि अशा सेवांच्या पुढील वापरासाठी या अटी व शर्ती स्वयंचलितपणे लागू होतील.

- ग्राहक याद्वारे स्वीकार करतो आणि मान्य करतो की, सेवांमध्ये समाविष्ट असलेले आणि बँकने सेवांच्या तरतुदीदरम्यान विकसित/निर्मित केलेले बौद्धिक संपदा अधिकार, पूर्णपणे बँकेच्या मालकीचे असतील आणि बँकेकडे निहित राहतील आणि या अटी व शर्ती कोणत्याही प्रकारे ग्राहकांना बौद्धिक संपदा अधिकारांच्या मालकीचा किंवा वापराचा कोणताही अधिकार देत नाही.

**सॉफ्टवेअर**

बँक वेळोवेळी ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग वापरण्यास आवश्यक असलेले इंटरनेट सॉफ्टवेअर, जसे की ब्राउझर, याबाबत सूचना देईल. या इंटरनेट सॉफ्टवेअरच्या सर्व आवृत्तींना सपोर्ट करण्यासाठी बँकेवर कोणतेही बंधन असणार नाही. वापरकर्त्याने त्याचे सॉफ्टवेअर, हार्डवेअर आणि ऑपरेटिंग सिस्टीम वेळोवेळी स्वतःच्या खर्चाने अद्ययावत करणे आवश्यक आहे आणि बँकेवर वापरकर्त्याचे सॉफ्टवेअर, हार्डवेअर व ऑपरेटिंग सिस्टीम समर्थित करण्याची कोणतीही जबाबदारी राहणार नाही; ही जबाबदारी पूर्णपणे वापरकर्त्याची राहील.

**सुरक्षा**

बँक आपल्याकडे उपलब्ध तंत्रज्ञानाचा उपयोग करून ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सेवेस सुरक्षित ठेवण्यासाठी व त्यामध्ये अनधिकृत प्रवेश प्रतिबंधित करण्यासाठी योग्य ती खबरदारी घेईल.

- ग्राहकाने, स्वतःच्या जोखमीवर आणि परिणामांच्या जबाबदारीवर, ॲक्सिस बँकेने वेळोवेळी विहित केलेल्या सुरक्षा कार्यपद्धतीचे पालन करून सेवांचा वापर करावा; यामध्ये (i) वापरकर्ता-आयडी आणि पासवर्ड, (ii) **इंटरनेट बँकिंग वापरण्यासाठी 'वन टच' उपकरणांचा वापर यांचा समावेश आहे
  सेवा. याव्यतिरिक्त, ॲक्सिस बँक ग्राहकांना ॲक्सिस बँकेला आवश्यक असल्याप्रमाणे अशा इतर सुरक्षा प्रक्रिया आणि प्रमाणीकरणाच्या पद्धतींचा अवलंब करण्याचा सल्ला देऊ शकते आणि ग्राहक अशा सुरक्षा प्रक्रियेचे पालन करण्यास सहमत आहे.

**बँकेद्वारे या प्लॅटफॉर्मसाठी ज्या वेळी सेवा सुरू केल्या जातील त्या वेळी

- ग्राहकाने आणि ग्राहकाने अधिकृत केलेल्या वापरकर्त्यांनी, सर्व युजर आयडी आणि पासवर्ड, ओटीपी, पासवर्डसह, गोपनीय आणि चांगल्या प्रकारे संरक्षित ठेवावेत आणि ते ॲक्सिस बँकेचे कर्मचारी आणि प्रतिनिधी, विक्रेते, भागीदार यांच्यासह कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला उघड करू नयेत. ग्राहकाने किंवा वापरकर्त्याने कोणत्याही तृतीय पक्षाला पासवर्ड उघड केल्यामुळे ग्राहकाचे कोणतेही नुकसान झाल्यास, ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

- बँकेकडून प्रदान केलेल्या अनिवार्य 2 फॅक्टर ऑथेंटिकेशन (2एफए) द्वारेच ग्राहकाला इंटरनेट बँकिंग चॅनेलचा प्रवेश दिला जाईल. ॲक्सिस बँक आपल्या उत्पादनाचा भाग म्हणून वेळोवेळी एसएमएस, वन-टच उपकरणे किंवा अशा इतर कोणत्याही मार्गांनी 2 एफए प्रदान करू शकते. ग्राहक हे सुनिश्चित करतील की प्रत्येक वापरकर्ता त्याच्या 2 घटक प्रमाणीकरणाच्या सुरक्षेसाठी जबाबदार असेल.

- इंटरनेट बँकिंग चॅनेलमध्ये व्यवहार आणि विनंत्या ॲक्सेस करताना किंवा मंजूर करताना ग्राहकांना हे 2 एफए वापरणे अनिवार्य असेल.

- वापरकर्ता त्यांचे मोबाईल उपकरण किंवा वन टच उपकरण (ज्याला हार्ड टोकन असेही म्हणतात) यांच्या सुरक्षेसाठी जबाबदार असतील आणि 2 एफए वापरून संस्थेच्या सदस्यांनी दिलेल्या कोणत्याही आणि सर्व सूचना आणि/किंवा व्यवहारांना बांधील असतील. ॲक्सिस बँक सुरक्षा प्रक्रियेचा वापर करून दिलेल्या सर्व सूचना प्रमाणित, सत्य म्हणून गृहित धरण्यास पात्र असेल.

- वापरकर्त्याच्या इंटरनेट बँकिंग ॲक्सेसचा गैरवापर प्रतिबंधित करण्यासाठी आवश्यक प्रतिबंधाकरिता 2 एफए ची तडजोड होऊ शकणाऱ्या मोबाईल उपकरणाचे कोणतेही नुकसान किंवा चोरी किंवा गहाळ होणे किंवा हानी बँकेला त्वरित कळविणे आवश्यक आहे.

- ॲक्सिस बँक वेळोवेळी उद्योगक्षेत्रात उपलब्ध असलेल्या योग्य सुरक्षा उपाययोजनांचा अवलंब करण्याचा प्रयत्न करेल. तथापि, ग्राहक मान्य करतो की इंटरनेटसह वापरलेले तंत्रज्ञान तसेच सार्वजनिक/सामायिक सुविधांचा वापर अनेक जोखीमांसाठी संवेदनशील आहे, जसे की गैरवापर, हॅकिंग, व्हायरस, विद्वेशपूर्ण, विध्वंसक किंवा करप्टिंग कोड, प्रोग्राम किंवा मॅक्रो जे सेवांवर परिणाम करू शकतात. अशा जोखमींमुळे सूचनांच्या प्रक्रियेत, अहवाल देण्यात आणि/किंवा पावती तयार करण्यात होणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी, विलंबासाठी किंवा अपयशासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

**डाटा, ऑडिट आणि सुरक्षा**

- ग्राहकाने आणि ग्राहकाने अधिकृत केलेल्या वापरकर्त्यांनी, सर्व वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड, ओटीपी, पासवर्डसह, गोपनीय आणि चांगल्या प्रकारे संरक्षित ठेवावेत आणि ते ॲक्सिस बँकेचे कर्मचारी आणि प्रतिनिधी, विक्रेते, भागीदार यांच्यासह कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला उघड करू नयेत. ग्राहकाने किंवा वापरकर्त्याने कोणत्याही तृतीय पक्षाला पासवर्ड उघड केल्यामुळे ग्राहकाचे कोणतेही नुकसान झाल्यास, ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

- ग्राहकाला बँकद्वारे प्रदान केलेल्या अनिवार्य 2 फॅक्टर ऑथेंटिकेशन (2एफए) द्वारे ॲक्सिस निओ फॉर बिझनेसचा ॲक्सेस दिला जाईल. ॲक्सिस बँक आपल्या उत्पादनाचा भाग म्हणून वेळोवेळी एसएमएस किंवा अशा इतर कोणत्याही मार्गांनी 2 एफए प्रदान करू शकते. ग्राहक हे सुनिश्चित करतील की प्रत्येक वापरकर्ता त्याच्या 2 घटक प्रमाणीकरणाच्या सुरक्षेसाठी जबाबदार असेल. ॲक्सिस निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्मवरील सेवांचा वापर करताना किंवा व्यवहार आणि विनंत्या मंजूर करताना ग्राहकांना अनिवार्यपणे या 2 घटक प्रमाणीकरणाचा वापर करावा लागेल.
- वापरकर्ता त्यांचे मोबाईल उपकरण किंवा वन टच उपकरण (ज्याला हार्ड टोकन असेही म्हणतात) यांच्या सुरक्षेसाठी जबाबदार असतील आणि 2एफए वापरून संस्थेच्या सदस्यांनी दिलेल्या कोणत्याही आणि सर्व सूचना आणि/किंवा व्यवहारांना बांधील असतील. ॲक्सिस बँक सुरक्षा प्रक्रियेचा वापर करून दिलेल्या सर्व सूचना प्रमाणित, सत्य म्हणून गृहित धरण्यास पात्र असेल.

- मोबाइल उपकरणांचे कोणतेही नुकसान, चोरी, गहाळ होणे किंवा बिघाड झाल्यास, ज्यामुळे 'टू-फॅक्टर ऑथिंटेकशन' (2एफए) धोक्यात येऊ शकते, अशा घटनेची माहिती बँकेला त्वरित कळविली पाहिजे; जेणेकरून वापरकर्त्याच्या 'ॲक्सिस निओ फॉर बिझनेस' प्लॅटफॉर्मच्या प्रवेशाचा गैरवापर रोखण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतील.

- ॲक्सिस बँक वेळोवेळी उद्योगक्षेत्रात उपलब्ध असलेल्या योग्य सुरक्षा उपाययोजनांचा अवलंब करण्याचा प्रयत्न करेल. तथापि, ग्राहक मान्य करतो की इंटरनेटसह वापरलेले तंत्रज्ञान तसेच सार्वजनिक/सामायिक सुविधांचा वापर अनेक जोखीमांसाठी संवेदनशील आहे, जसे की गैरवापर, हॅकिंग, व्हायरस, विद्वेशपूर्ण, विध्वंसक किंवा करप्टिंग कोड, प्रोग्राम किंवा मॅक्रो जे सेवांवर परिणाम करू शकतात. अशा जोखमींमुळे सूचनांच्या प्रक्रियेत, अहवाल देण्यात आणि/किंवा पावती तयार करण्यात होणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी, विलंबासाठी किंवा अपयशासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

- वापरकर्ता आणि निओ फॉर बिझनेस यांपैकी प्रत्येक पक्ष एकमेकांना असे आश्वासन आणि प्रतिज्ञा देतो की, (a) ते भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विहित केलेल्या डेटा सुरक्षा नियमांचे पालन करतील, ज्यामध्ये सुरक्षा घटनांचे व्यवस्थापन आणि रिपोर्टिंगच्या कार्यपद्धतीचा समावेश आहे.; आणि (b) त्याची प्रणाली आणि पायाभूत सुविधा या पेमेंट कार्ड इंडस्ट्री-डेटा सिक्युरिटी स्टँडर्ड ("पीसीआय-डीएसएस") चे अनुपालन करतात. वापरकर्ता निओ फॉर बिझनेसला पुढे असे आश्वासन आणि वचन देतो की, त्याची प्रणाली आणि पायाभूत सुविधा, लागू असल्यानुसार, पेमेंट ॲप्लिकेशन-डेटा सिक्युरिटी स्टँडर्ड ("पीए-डीएसएस") च्या मानकांशी सुसंगत आहेत.*

“[* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू.]”

**पासवर्ड**

वापरकर्ता खालील गोष्टी स्वीकारतो आणि त्यांना बिनशर्तपणे मान्यता देतो:

- खातेधारकाचा अर्ज मंजूर झाल्यानंतर, ग्राहकाला एक लॉग-इन दिला जाईल आणि ॲक्सिस निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्मवर पासवर्ड तयार केला जाईल.
- पासवर्डमध्ये तुमच्या युजरनेम/वैयक्तिकृत लॉग-इन आयडी आणि ग्राहक आयडी प्रमाणे सर्व वर्ण असू शकत नाही.
- पासवर्डमध्ये अनिवार्यपणे अंक, विशेष वर्ण आणि किमान 1 कॅपिटल अक्षराचा समावेश असणे आवश्यक आहे.
- पासवर्डमध्ये या विशेष वर्णांना अनुमती आहे .!@$%^&*-+{}'|/-
- पासवर्ड दरम्यान स्पेसला अनुमती नाही.
- पासवर्डमध्ये किमान 8 वर्ण आणि कमाल 30 वर्ण असावेत.
- तुमचा पासवर्ड तुमच्या मागील 5 पासवर्ड सारखाच असू शकत नाही.
- वापरकर्त्याला पासवर्ड कितीही वेळा बदलण्याची मुभा आहे, परंतु त्यातून होणारी सर्व जोखीम व परिणाम केवळ वापरकर्त्याच्या जबाबदारीवर राहतील. बदललेल्या पासवर्डची गुप्तता राखण्याची संपूर्ण जबाबदारी वापरकर्त्यावर राहील, आणि अधिकृत वापरकर्त्याशिवाय त्या पासवर्डचा गैरवापर झाल्यास त्यासाठी बँक कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही.
- वापरकर्त्याच्या युजर आयडी/पासवर्डच्या गैरवापरामुळे होणाऱ्या कोणत्याही तोट्यासह, बँक या बाबतीत कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही.
- वापरकर्ता पासवर्ड विसरल्यास, प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या “पासवर्ड विसरलात” सुविधेचा वापर करून नवीन पासवर्ड तयार करता येईल.

**सुरक्षा प्रश्नांची उत्तरे**

वापरकर्ता खालील गोष्टी स्वीकारतो आणि त्यांना बिनशर्तपणे मान्यता देतो:

इंटरनेट बँकिंग लॉग-इनची सुरक्षा वाढविण्यासाठी ग्राहक सुरक्षा प्रश्नांचे उत्तर सेट करतो.

वापरकर्त्यास शाखेत विनंती नोंदवून उत्तरं कितीही वेळा बदलण्याची मुभा आहे. परंतु यामुळे उद्भवणाऱ्या सर्व जोखीम व परिणाम फक्त वापरकर्त्याच्या जबाबदारीस अधीन राहतील. वापरकर्ता अशा प्रकारे बदललेल्या उत्तरांची गोपनीयता

राखण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असेल आणि अधिकृत वापरकर्त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीद्वारे उक्त उत्तरांचा गैरवापर झाल्यास बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. ग्राहक हे सुनिश्चित करतो की सुरक्षा प्रश्नांची उत्तरे तृतीय पक्षांपासून गोपनीय ठेवली जातील आणि त्याचा/तिचा लॉग-इन पासवर्ड, सुरक्षा प्रश्नांची उत्तरे आणि व्यवहार पासवर्ड ओळखण्यास सुलभ स्वरूपात, युजरनेमसह किंवा इंटरनेट सेवांसह वापरण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही वस्तूंवर जतन केले जाणार नाहीत. जर ग्राहकाने आपला सुरक्षा प्रश्न/उत्तरे अन्य कोणत्याही व्यक्तीस माहिती होऊ दिला. तर त्या व्यक्तीने केलेल्या किंवा त्याच्या संमतीने झालेल्या सर्व व्यवहारांशी संबंधित सर्व दावे, नुकसान व परिणामी परिणामासाठी ग्राहक पूर्णपणे जबाबदार राहील. बँक या संदर्भात कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही, तसेच या तपशीलांच्या गैरवापर / अनधिकृत वापरामुळे वापरकर्त्याला होणाऱ्या कोणत्याही तोट्यासाठी बँक उत्तरदायी राहणार नाही. जर वापरकर्त्याने उत्तरं विसरल्यास ती रिसेट करण्यासाठी शाखेशी संपर्क साधता येईल.

**शुल्क**

ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधेअंतर्गत कोणतीही सेवा प्रदान करण्यासाठी वापरकर्त्याकडून कोणतेही निश्चित शुल्क आकारण्याचा आणि वसूल करण्याचा अधिकार बँकेकडे राखीव आहे. वापरकर्ता बँकेला अधिकृत करतो की ती सेवा शुल्काची वसूली वापरकर्त्याच्या कोणत्याही खात्यामधून कपात करुन किंवा वापरकर्त्याला बिल पाठवून करेल. ज्यासाठी वापरकर्ता निर्दिष्ट केलेल्या कालावधीत भरणा करण्यास जबाबदार राहील. जर वापरकर्त्याने असे केले नाही, तर बँक सेवा शुल्क योग्य वाटणाऱ्या पद्धतीने, व्याजासहित (काही असल्यास) वसुली करेल आणि/किंवा ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगची सुविधा काढून घेईल आणि त्याबाबत बँक कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही.

- ग्राहक याद्वारे ॲक्सिस बँकेने वेळोवेळी निर्धारित केलेल्या सेवांवर लागू होणारे सर्व शुल्क (वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) सह सर्व लागू कर वगळून असतील आणि ते ग्राहक/खातेदाराने भरावे लागतील) देण्यास सहमत आहे, किंवा सेवांचा लाभ घेण्यासाठी वेळोवेळी मान्य केलेले दर/शुल्क आणि ॲक्सिस बँकेला योग्य वाटेल अशा वेबसाईटद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमातून ग्राहकांना कळवले जातील. ॲक्सिस बँक ग्राहकांच्या खात्यातून असे शुल्क डेबिट करण्यास अधिकृत आहे.
- बँक याद्वारे खालीलप्रमाणे सहमत आहे आणि हमी देते:

(i) बँक निर्मित बिलावर (जर असल्यास) ग्राहकाने दिल्याप्रमाणे ग्राहकाचा जीएसटी क्रमांक असेल;

(ii) ग्राहकांना केलेल्या पुरवठ्यासाठी विहित नमुन्यात बँक जीएसटीएन सामान्य पोर्टलवर इनव्हॉइस (जर असल्यास) तपशील अपलोड करेल; आणि बँक ग्राहकाला दिलेल्या पुरवठ्यावर लागू असलेला जीएसटी भरेल आणि जीएसटी कायद्यांतर्गत विहित केलेल्या वैधानिक कालमर्यादेत जीएसटी परतावा दाखल करेल.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

सर्व पत्रव्यवहार व सूचनांची देवाणघेवाण बँकद्वारे फक्त बँकेकडे नोंदवलेल्या सामान्य टपाल पत्ता किंवा ई-मेल पत्त्यावरच केली जाईल. त्याची प्राप्ती न झाल्यास बँक कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही. जर निओ फॉर बिझनेस खाते उघडताना ग्राहकाच्या ई-मेल पत्त्याची बँकेकडे नोंदणी केलेली नसेल, तर ग्राहक निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्मवर त्यांचा ई-मेल पत्ता अद्ययावत करू शकतो आणि त्यानंतर या प्लॅटफॉर्मवरून होणारा सर्व पत्रव्यवहार त्याच ई-मेल पत्त्यावर पाठविला जाईल.

**इंटरनेट बँकिंगवर उपलब्ध सेवा**

वापरकर्त्यांना इंटरनेट बँकिंग काही ठराविक डिफॉल्ट सुविधांसह प्रदान केले जाईल ज्यासाठी दुसऱ्या स्तरावरील प्रमाणीकरणाची *) आवश्यकता नसते, जसे की परिशिष्ट I मध्ये सविस्तर नमूद केले आहे. इंटरनेट बँकिंगच्या सर्व सुविधांचा लाभ घेण्यासाठी, वापरकर्त्याला इंटरनेट बँकिंगमध्ये लॉग इन करून नेटसिक्युअर* (दुसऱ्या स्तरावरील प्रमाणीकरण) साठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. नेटसिक्युअरसह* आणि शिवाय उपलब्ध सुविधा परिशिष्ट I मध्ये तपशीलवार आहेत.

*बँकेद्वारे ज्या वेळी सादर करण्यात येईल त्या वेळी

**बँकेची अधिकारिता**

- वापरकर्त्याचा वापरकर्ता आयडी व पासवर्ड प्रमाणीकरणानंतरच वापरकर्त्याच्या खाते/खात्यात ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग व्यवहार करण्यास परवानगी असेल. वापरकर्ता (संयुक्त खाते धारकासह, जर कोणी असल्यास) ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगद्वारे त्याच्याद्वारे केलेले बँकिंग व्यवहारांची अंमलबजावणी करण्यासाठी बँकेस स्पष्ट अधिकार प्रदान करतो. ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगद्वारे वापरकर्त्याकडून प्राप्त झालेल्या किंवा वापरकर्त्याने पाठविल्याचा दावा केलेल्या कोणत्याही व्यवहाराची सत्यता पडताळण्याची, युजर-आयडी आणि पासवर्डच्या पडताळणीव्यतिरिक्त, कोणतीही जबाबदारी बँकेवर राहणार नाही. ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधेचा बेकायदेशीर किंवा अयोग्य वापर केल्यास, बँकद्वारे निर्धारित केल्याप्रमाणे आर्थिक शुल्काच्या पेमेंटसाठी वापरकर्ता जबाबदार असेल किंवा इंटरनेट बँकिंग व्यवहारांची सुविधा निलंबित केली जाऊ शकते.

- ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगच्या ऑपरेशनच्या वेळी वापरकर्त्याने तयार केलेले डिस्प्ले किंवा प्रिंटेड आऊटपुट हे इंटरनेटच्या ऑपरेशन्सची नोंद आहे आणि ती संबंधित व्यवहारांची बँकेची अधिकृत नोंद म्हणून ग्राह्य धरली जाणार नाही. बँकेने संगणक प्रणालीद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने ठेवलेली व्यवहारांची स्वतःची नोंद सर्व उद्दिष्टांसाठी अंतिम आणि बंधनकारक म्हणून स्वीकारली जाईल. जोपर्यंत वापरकर्त्याने त्यांच्या खाते प्रवेशाच्या तारखेपासून किंवा त्यांना नियतकालिक विवरण पाठवल्याच्या तारखेपासून, यापैकी जी लवकर असेल त्या तारखेपासून एका आठवड्याच्या आत कोणतीही विसंगती दर्शविली जात नाही.

**माहितीची अचूकता**

- ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगच्या वापराद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मेल किंवा लिखित पत्रव्यवहार सारख्या अन्य कोणत्याही माध्यमांद्वारे बँकेला पुरवलेल्या माहितीच्या अचूकतेसाठी वापरकर्ता जबाबदार आहे. वापरकर्त्याने पुरवलेल्या चुकीच्या माहितीमुळे उद्भवणाऱ्या परिणामांसाठी बँक कोणतेही दायित्व स्वीकारत नाही. वापरकर्त्याने नियमित अंतराने विवरणाची अचूकता तपासायला हवी आणि कोणत्याही विसंगतीबद्दल बँकेला सूचित करावे.
- विवरणाचे सर्व आऊटपुट हे खात्याचे ड्युप्लिकेट विवरण आहेत आणि ते इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे तयार केले जातील आणि त्यामध्ये असलेली माहिती बँकेद्वारे राखलेल्या संगणकीकृत बॅक-अप सिस्टीममधून प्राप्त केली जाईल. विवरणाची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी बँक सर्व तर्कसंगत उपाय करेल. मात्र बँक कोणत्याही त्रुटीसाठी जबाबदार नाही. वरील आउटपुटमध्ये दिलेली माहिती चुकीची किंवा अयोग्य असल्यास, त्यातून होणारे कोणतेही नुकसान, हानी किंवा इतर परिणाम यासाठी वापरकर्ता बँकला मुक्त ठेवेल आणि बँकवर कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

**वापरकर्त्याचे दायित्व**

जर वापरकर्त्याने अटींचे उल्लंघन केले असेल किंवा खालीलप्रमाणे निष्काळजी कृती करून नुकसान केले किंवा होऊ दिले असेल, तर ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग अकाउंटमध्ये झालेल्या अनधिकृत व्यवहारांमुळे होणारे नुकसान यासाठी फक्त वापरकर्ताच जबाबदार राहील:

- ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग पासवर्डचा लिखित किंवा इलेक्ट्रॉनिक नोंद ठेवणे

- ॲक्सिस बँकेचा इंटरनेट बँकिंग पासवर्ड कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीसह, बँक कर्मचाऱ्यांसह इतर कोणालाही उघड करणे किंवा उघड होण्यापासून रोखण्यासाठी सर्व वाजवी पाऊले उचलण्यास अयशस्वी होणे आणि/किंवा वाजवी वेळेत अशा खुलाश्याची माहिती बँकेला देण्यास अयशस्वी होणे.

- जर ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग खात्यात अनधिकृत ॲक्सेस किंवा चुकीचे व्यवहार झाले, तर त्यासंबंधी बँकला तर्कसंगत वेळेत सूचित न करणे.

- नैसर्गिक आपत्ती, पूर, आग किंवा कोणत्याही प्रकारच्या इतर नैसर्गिक आपत्ती, कायदेशीर प्रतिबंध, दूरसंचार नेटवर्क किंवा इंटरनेटची तांत्रिक त्रुटी किंवा नेटवर्क फेल्युअर, वीज खंडित होणे किंवा यूपीएस फेल्युअर, सॉफ्टवेअर किंवा हार्डवेअर फेल्युअर आणि/किंवा त्रुटी यासारख्या, परंतु त्यापुरते मर्यादित नसलेल्या कारणांसाठी किंवा बँकेच्या तर्कसंगत नियंत्रणाबाहेरील इतर कोणत्याही कारणांमुळे ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग इच्छित प्रकारे उपलब्ध नसेल, तर बँक वापरकर्त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकारल्याप्रमाणे 'सायबर संबंधित गुन्हे' च्या व्याख्येनुसार वापरकर्त्याव्यतिरिक्त

इतर कोणत्याही व्यक्तीद्वारे अकाउंट हॅकिंगमुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. कोणत्याही परिस्थितीत बँक कोणत्याही प्रकारच्या हानीबाबत जबाबदार राहणार नाही, जरी ती हानी थेट, अप्रत्यक्ष, संयोगात्मक, परिणामी स्वरूपाची असली तरीही; तसेच ती हानी उत्पन्न, गुंतवणूक, उत्पादन, प्रतिष्ठा, नफा, व्यवसायातील व्यत्यय किंवा कोणत्याही स्वरूपाची किंवा प्रकाराची असो, आणि ती हानी वापरकर्त्याला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला झाली तरीही.

- व्यवहारांच्या प्रक्रियेदरम्यान, सेवा पुरवठादारांच्या प्रक्रिया यंत्रणेशी आणि लागू असलेले कायदे व आरबीआयच्या  मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत असल्यास, ॲक्सिस बँक त्या सेवा पुरवठादारांमार्फत प्राप्त होणारे सर्व इलेक्ट्रॉनिक संवाद, आदेश किंवा संदेश ग्राह्य धरण्यास आणि त्यावर विसंबून राहण्यास पात्र असेल. ॲक्सिस बँक कोणत्याही संवाद, आदेश किंवा संदेश पाठवणाऱ्याची ओळख किंवा संदेशाच्या प्रामाणिकतेची स्वतंत्रपणे पडताळणी किंवा अधिक चौकशी करण्यास बांधील राहणार नाही.
- ॲक्सिस बँक हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करेल की सेवांचा प्रवेश आणि उपलब्धता अखंडित आणि त्रुटीमुक्त राहील. तथापि, दुरुस्ती, देखभाल किंवा नवीन सुविधा आणि सेवा सुरू करण्यासाठी ॲप्लिकेशनचा ॲक्सेस कधीकधी निलंबित किंवा प्रतिबंधित केला जाऊ शकतो आणि अशा प्रकरणांमध्ये ॲक्सिस बँक कोणत्याही सेवांच्या कोणत्याही व्यत्ययासाठी जबाबदार असणार नाही. आम्ही सॉफ्टवेअर अपडेट्सची वेळ आणि कंटेंट निर्धारित करण्याचा अधिकार राखून ठेवतो, जे वापरकर्त्याला पूर्वसूचना न देता कोणत्याही वेळी ॲप्लिकेशनद्वारे स्वयंचलितपणे डाउनलोड आणि इन्स्टॉल केले जाऊ शकतात.

**वॉरंटची अस्वीकृती**

येथे हमी दिल्याप्रमाणे आणि अटी व शर्ती वगळता, ॲक्सिस बँक येथे प्रदान केलेल्या सेवांबाबत इतर कोणतीही स्पष्ट किंवा निहित हमी देत नाही आणि याद्वारे कोणत्याही प्रकारच्या सर्व हमी स्पष्टपणे नाकारते, मग त्या स्पष्ट असो किंवा निहित असो किंवा वैधानिक असो, ज्यामध्ये ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग प्रणाली/सेवांचे अखंड, त्रुटी-मुक्त, वेळेवर किंवा सुरक्षित कामगिरी, शीर्षक, समाधानकारक गुणवत्ता, व्यापारक्षमता, विशिष्ट उद्देशासाठी योग्यता, डाटा अचूकता आणि पूर्णता आणि इंटरनेट बँकिंगमध्ये उल्लंघन न करण्याशी संबंधित कोणत्याही हमी किंवा ॲक्सिस बँकेकडून ग्राहकांना माहितीचे व्हायरसमुक्त प्रसारण यांचा समावेश आहे परंतु त्यापुरते मर्यादित नाही.

सेवा जशा आहेत तशा आणि ज्या स्वरूपात उपलब्ध आहेत त्या तत्त्वावर प्रदान केल्या जातात. ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारची सर्व हमी स्पष्टपणे नाकारते, मग ती स्पष्ट असो किंवा निहित असो, ज्यामध्ये व्यापारक्षमतेची निहित हमी, विशिष्ट उद्देशासाठी योग्यता यांचा समावेश होतो परंतु त्यापुरते मर्यादित नाही. ॲक्सिस बँक कोणतीही हमी देत नाही की सेवा अखंडित, वेळेवर, सुरक्षित किंवा त्रुटीमुक्त असतील. कायद्याने अनुमती दिलेल्या जास्तीत जास्त मर्यादेपर्यंत, वेबसाईटचा प्रवेश आणि सेवांच्या वापरामुळे उद्भवणारी संपूर्ण जोखीम केवळ वापरकर्त्याचीच असेल. प्रत्येक सेवेसाठी उत्तरदायित्वाची एक स्वतंत्र मर्यादा लागू असेल.

**नुकसानभरपाई**

वापरकर्ता बँकेस सर्व कारवाई, दावे, मागण्या, कार्यवाही, नुकसान, हानी, खर्च, शुल्क आणि इतर कोणत्याही प्रकारच्या खर्चांपासून मुक्त ठेवेल आणि त्याची भरपाई करेल, जे काहीही बँक ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधा प्रदान करताना किंवा वापरकर्त्याने दिलेल्या सूचनांवर सद्भावनेने कृती करण्यास, न करण्यास किंवा निष्काळजीपणे कृती न करण्यास होणाऱ्या परिणामांमुळे भोगावे लागेल किंवा भोगले गेले.

ग्राहक सहमत आहे की ग्राहक ॲक्सिस बँक, तिचे अधिकारी, संचालक, एजंट, विक्रेते, भागीदार, सहयोगी, कर्मचारी आणि प्रतिनिधींना सर्व कृती, दावे, मागण्या, प्रकरणे, नुकसान, हानी, खर्च, शुल्क आणि अन्य सर्व प्रकारच्या खर्चांपासून, जे ॲक्सिस बँकेला कधीही भोगू लागू शकतात, सहन करावे लागू शकतात किंवा अनुभवू लागू शकतात, सुरक्षित ठेवेल आणि हानिरक्षित ठेवेल, हे सेवा पुरवण्याच्या परिणामस्वरुप किंवा कारणास्तव किंवा ग्राहकाच्या कोणत्याही दुर्लक्ष/चूक/गैरवर्तन यामुळे किंवा ग्राहकाच्या कोणत्याही अटींचे उल्लंघन किंवा पालन न केल्यामुळे, समाविष्ट कायदा आणि सेवा संबंधित कायदेशीर मार्गदर्शक तत्त्वांसह, किंवा ॲक्सिस बँकेने सद्भावनेने दिलेल्या कोणत्याही सूचनेवर कृती करण्यास किंवा न करण्यास घेतलेल्या निर्णयामुळे उद्भवलेले असेल.

ग्राहक सहमत आहे की ग्राहकाने केलेल्या कोणत्याही कृती किंवा वगळण्याच्या अनुषंगाने कोणत्याही सरकारी संस्थेने,

नियामक प्राधिकरणाने किंवा तृतीय पक्षाने ॲक्सिस बँकेविरुद्ध केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा त्या कारवाईमुळे किंवा त्या कारणास्तव उद्भवणाऱ्या कोणत्याही कृती, दावे, मागण्या, कार्यवाही, तोटा, नुकसान, खर्च, शुल्क आणि खर्चापासून ॲक्सिस बँक, तिचे अधिकारी, संचालक, एजंट, विक्रेते, भागीदार, सहयोगी, कर्मचारी आणि प्रतिनिधींना ग्राहक नुकसानभरपाई देईल आणि त्यांना हानीरहित ठेवेल.

**इंटरनेट बँकिंग रेकॉर्ड आणि व्यवहार अटी**

- ॲक्सिस बँक ग्राहकाच्या वतीने पडताळणीसाठी ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने ग्राहकांना खात्यांचे स्टेटमेंट जारी करेल. ग्राहकाने व्यवहाराच्या तारखेपासून 7 (सात) दिवसांच्या आत त्यातील कोणत्याही विसंगतीची तक्रार ॲक्सिस बँकेकडे करणे आवश्यक आहे. जर ग्राहक उपरोक्त कालावधीत विसंगतीची नोंद करण्यात अपयशी ठरला, तर व्यवहाराच्या अंमलबजावणीच्या अचूकतेवर किंवा खात्यातून वजा केलेल्या रकमेवर वाद घालण्याचा अधिकार ग्राहकाला राहणार नाही, यास ग्राहक सहमत आहे.
- नोंदवलेल्या व्यवहाराच्या वेळेसह, सूचनांमधून उद्भवलेल्या व्यवहारांद्वारे तयार केलेल्या ॲक्सिस बँकेच्या सर्व नोंदी, ॲक्सिस बँकेला मिळालेल्या सूचना आणि त्यानंतर झालेल्या व्यवहाराची अचूकता आणि प्रमाणित असल्याचा पुरावा असतील
- ग्राहक कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत पुरावा म्हणून ॲक्सिस बँकेच्या नोंदी दाखल करण्यावर आक्षेप न घेण्यास सहमत आहे. कारण अशा नोंदी मूळ , लेखी किंवा संगणकाद्वारे निर्मित कागदपत्रे नाहीत.
- ॲक्सिस बँकेला ग्राहकाकडून प्राप्त झालेली सर्व माहिती, कोणत्याही सक्षम न्यायालय किंवा न्यायिक किंवा निम-न्यायिक संस्था किंवा लवाद किंवा इतर कोणत्याही वैधानिक किंवा सरकारी प्राधिकरणासमोर ग्राहकाच्या विरोधात पुरावा म्हणून वापरण्याची परवानगी आहे.
- ट्रेड पोर्टल सेवांमध्ये व्यवहार सुरू झाल्यापासून कामकाजाच्या दोन दिवसांच्या आत क्लायंटने लागू स्टॅम्पिंग सह सर्व मूळ कागदपत्रे (जेथे लागू असेल तेथे) संबंधित शाखेत सादर करावीत.

**वैयक्तिक माहितीचे प्रकटीकरण**

वापरकर्ता सहमत आहे की बँक किंवा त्याचे कंत्राटदार ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सेवांच्या संदर्भात तसेच सांख्यिकीय विश्लेषण आणि क्रेडिट स्कोअरिंगच्या संदर्भात त्याची वैयक्तिक माहिती संगणकावर किंवा इतर पद्धतीने ठेवू शकतात आणि त्यावर प्रक्रिया करू शकतात. वापरकर्ता तसेच मान्य करतो की बँक, अत्यंत गोपनीयतेने, इतर संस्था/संस्थांशी अशी वैयक्तिक माहिती उघड करू शकते जी तर्कसंगत कारणास्तव आवश्यक असेल, त्यात खालील बाबी समाविष्ट असू शकतात, परंतु त्यापुरतेच मर्यादित नाहीत:

  - कोणत्याही दूरसंचार किंवा इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग नेटवर्कमध्ये सहभागी होण्यासाठी.
  - कायदेशीर निर्देशांचे पालन.
  - मान्यताप्राप्त क्रेडिट रेटिंग / स्कोअरिंग एजन्सीद्वारे क्रेडिट रेटिंगसाठी.
  - फसवणूक-प्रतिबंध हेतूंसाठी.

ग्राहक याद्वारे ॲक्सिस बँकेद्वारे ग्राहकाची गोपनीय माहिती वापरण्यास आणि ॲक्सिस बँकेद्वारे ग्राहकाशी संबंधित कोणतीही माहिती शाखा, सहाय्यक, प्रतिनिधी कार्यालये, संलग्न, लेखापरीक्षक, विक्रेते, भागीदार आणि एजंट्स यांना आणि त्यांच्या दरम्यान हस्तांतरित करण्यास अधिकृत करतो आणि अशी कोणतीही शाखा, सहाय्यक, प्रतिनिधी कार्यालय, संलग्न, विक्रेता, भागीदार किंवा एजंट कोणत्याही कायदा, न्यायालय, नियामक किंवा कायदेशीर प्रक्रियेद्वारे आवश्यक असलेली कोणतीही माहिती हस्तांतरित करण्यास पात्र असेल.

ग्राहक याद्वारे व्हॉट्सॲप वरील संदेशांच्या देवाणघेवाणीसाठी अधिकृत संमती देत आहे. ॲक्सिस बँक पुष्टी करते की, ग्राहकांच्या इनव्हॉइसेसवर त्यांचा ईमेल आयडी किंवा फोन नंबर प्रिंट करण्यासाठी ग्राहकांकडून आवश्यक संमती घेतली जाईल. ॲक्सिस बँकेच्या नोंदींमध्ये सादर केलेला असा कोणताही ईमेल आयडी/फोन नंबर व्यवसाय संपर्क तपशील म्हणून विचारात घेतला जाईल आणि ॲक्सिस बँक निओ फॉर बिझनेस प्लॅटफॉर्मवरून ग्राहकांना पाठवल्या जाणाऱ्या इनव्हॉइसेस, कोटेशन्स, क्रेडिट नोट्स इत्यादींवर या तपशिलांचा उल्लेख करण्यास ग्राहकाची कोणतीही हरकत नाही,

अशी स्पष्ट संमती ग्राहक याद्वारे देत आहे.

**बँकेचा धारणाधिकार**

ॲक्सिस बँकेकडे क्लायंटच्या ॲक्सिस बँकेतील ठेवी, निधी किंवा इतर मालमत्तेवर, मग ते एकाच नावाने किंवा कोणत्याही व्यक्तीसोबत संयुक्तपणे ठेवलेले असोत, सुविधेच्या परिणामी किंवा त्याच्या संबंधात उद्भवणाऱ्या सर्व थकबाकीच्या मर्यादेपर्यंत, बँकरचे लियन आणि सेट-ऑफ याचा अधिकार असेल.

**मालकी हक्क**

- वापरकर्ता मान्य करतो की ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सेवा अंतर्गत असलेले सॉफ्टवेअर तसेच ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग ॲक्सेस करण्यासाठी आवश्यक असलेले इतर इंटरनेट संबंधित सॉफ्टवेअर संबंधित विक्रेत्यांची कायदेशीर प्रॉपर्टी आहे. ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग ॲक्सेस करण्यासाठी बँकेने दिलेली परवानगी वरील सॉफ्टवेअरमध्ये कोणताही मालकी हक्क किंवा स्वामित्वाचा हक्क हस्तांतरित करणार नाही. वापरकर्त्याने वरील प्रोग्राममध्ये कोणत्याही प्रकारे बदल, हस्तक्षेप किंवा प्रयोग करण्याचा प्रयत्न करू नये. वापरकर्त्याने केलेल्या कोणत्याही उल्लंघनाबाबत योग्य कायद्यांनुसार कारवाई केली जाईल, आणि त्यातून बँकेला होणाऱ्या नुकसानासाठी वापरकर्ता उत्तरदायी राहील.

- वापरकर्त्याने ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगच्या सॉफ्टवेअरमध्ये कोणताही बदल, भाषांतर, डिसॲसेंबल, डी-कंपाईल किंवा रिव्हर्स इंजिनियरिंग करण्याचा प्रयत्न करू नये, तसेच सॉफ्टवेअरवर आधारित कोणताही उपउत्पादन तयार करू नये.

- ॲक्सिस बँक प्लॅटफॉर्म आणि सेवांमधील सर्व कॉपीराइट्स, पेटंट्स, व्यापार गुपिते, ट्रेडमार्क्स, सर्व्हिस मार्क्स, व्यापाराची नावे, नैतिक अधिकार आणि इतर बौद्धिक संपदा व मालकी हक्क ("आयपीआर"), हे ॲक्सिस बँक आणि तिच्या परवानाधारकांची एकमेव आणि अनन्य मालमत्ता राहतील. ॲक्सिस बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय, आयपीआरची प्रत बनवणे, पुनरुत्पादन, वितरण, प्रसारित, प्रक्षेपित, प्रदर्शित, विक्री, परवाना देणे, अपलोड करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारे वापर केला जाऊ शकणार नाही.

**अटी व शर्तींमध्ये बदल**

बँकेला कोणत्याही वेळी कोणत्याही अटी सुधारित करण्याचा किंवा त्यात पूरक अटी जोडण्याचा पूर्ण अधिकार आहे. बँक वेळोवेळी ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगमध्ये नवीन सेवा सुरू करू शकते. नवीन फंक्शन्सची उपलब्धता जशी उपलब्ध होतील तशी वापरकर्त्यास सूचित केली जाईल. या नवीन सेवांचा वापर करून, वापरकर्ता www.axisbank.com या वेबसाइटवर वेळोवेळी निश्चित केल्या जाणाऱ्या अटी व शर्तींचे पालन करण्यास संमती देतो. या अटी व शर्तींमध्ये इतरत्र काहीही नमूद असले तरी, जेव्हा ॲक्सिस बँक सेवा अद्ययावत किंवा सुधारित करण्याचा किंवा ग्राहकांना नवीन सेवा देण्याचा निर्णय घेईल, तेव्हा असे उन्नतीकरण, सुधारणा आणि नवीन सेवा बँकेने ठरवून दिलेल्या अटींच्या अधीन असतील. तसेच, बँकेला आवश्यक वाटल्यास बँक कोणत्याही वेळी या अटींमध्ये सुधारणा किंवा भर घालू शकते, जी सुधारणा ग्राहकावर बंधनकारक असेल. ॲक्सिस बँक ग्राहकांना अशा बदलांची माहिती देण्याचा प्रयत्न करेल. या अटी आणि शर्तींमधील कोणताही बदल वेबसाईट/साईटवर अद्ययावत किंवा अपलोड केला जाईल आणि तो ग्राहकांसाठी अधिसूचित केला गेला आहे, असे मानले जाईल.

**अहस्तांतरणीयता**

ग्राहकाला सेवा देणे कोणत्याही परिस्थितीत हस्तांतरणीय नाही आणि ती फक्त ग्राहकाद्वारेच वापरली जाईल. ग्राहक सेवांशी संबंधित किंवा त्यातील कोणत्याही भागाशी संबंधित त्यांचे अधिकार आणि/किंवा जबाबदाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीकडे हस्तांतरित करणार नाही. ॲक्सिस बँक, सेवांशी संबंधित तिची कोणतेही दायित्वे पूर्ण करण्यासाठी एजंट्सना उपकंत्राट देऊ शकते आणि नियुक्त करू शकते.

**नोटीस**

**बँक आणि वापरकर्ता या अटी आणि नियमांनुसार सूचना देऊ शकतात:**

- पक्षांपैकी कोणाच्याही ई-मेलवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवलेली अशी नोटीस लेखी स्वरूपाची मानली

जाईल.

- सूचना लेखी स्वरूपात, प्रत्यक्ष हाताने देऊन किंवा वापरकर्त्याने दिलेल्या शेवटच्या पत्त्यावर टपालाद्वारे पाठवून दिल्या जातील; आणि बँकेच्या बाबतीत त्या खाली नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवणे आवश्यक आहे: ॲक्सिस बँक लिमिटेड, 'ॲक्सिस हाऊस', सी-2, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई – 400 025. याव्यतिरिक्त, ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगच्या सर्व वापरकर्त्यांना लागू होणाऱ्या सामान्य स्वरूपाच्या सूचना बँक आपल्या वेबसाइटवर प्रसिद्ध करू शकते. अशा सूचनांना प्रत्येक वापरकर्त्यास स्वतंत्रपणे दिलेल्या सूचनेच्या किंवा वृत्तपत्र/प्रिंट माध्यमात प्रकाशित केलेल्या सूचनेच्या समान परिणाम असेल.

**प्रशासकीय कायदा**

- वापरकर्ता बँकेला किमान 15 दिवसांची लिखित सूचना देऊन कधीही ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधा बंद करण्याची विनंती करू शकतो. अशी ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधा रद्द होण्यापूर्वी ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगद्वारे वापरकर्त्याच्या ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग खाते वर केलेल्या कोणत्याही व्यवहारासाठी वापरकर्ता जबाबदार राहील.

- वापरकर्ता आणि बँक यांच्यात उद्भवलेला कोणताही वाद किंवा मतभेद परस्पर विचारविनिमय / चर्चेद्वारे सोडवला जाईल, अन्यथा, तो लवादाकडे संदर्भित केला जाईल. लवादाची कार्यवाही भारतीय लवाद आणि सलोखा अधिनियम, 1998 च्या अनुषंगाने शासित आणि आयोजित केली जाईल आणि लवादाची कार्यवाही मुंबई येथे होईल.

- भारतीय प्रजासत्ताक व्यतिरिक्त इतर कोणत्याही देशाच्या कायद्यांचे पालन न केल्याबद्दल किंवा उल्लंघन केल्याबद्दल बँक, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणतेही दायित्व स्वीकारत नाही. ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सेवेचा वापरकर्त्याद्वारे भारताव्यतिरिक्त इतर देशातील इंटरनेटद्वारे ॲक्सेस केला जाऊ शकतो याचा अर्थ असा लावला जाणार नाही की उक्त देशाचे कायदे वापरकर्त्याच्या ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग खात्यामध्ये आणि/किंवा ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगच्या वापरातील या अटी व शर्ती आणि/किंवा ऑपरेशन्स नियंत्रित करतील. भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून व्यक्तीने ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधा वापरल्याने परिस्थितीत कोणताही फरक पडणार नाही आणि संबंधित वापरकर्ता भारत प्रजासत्ताकाच्या लागू कायद्यांच्या अधीन असल्याचे गृहित धरले जाईल

- सेवांची रचना, वैधता आणि कामगिरी आणि या अटी व शर्ती सर्व बाबतीत भारताच्या कायद्यांद्वारे नियंत्रित केल्या जातील. याद्वारे पक्षकार मुंबई येथील न्यायालयांच्या अ-विशेषाधिकारक्षेत्रात सादर करतात. ग्राहकाने ॲक्सिस बँकेच्या ग्राहक इंटरनेट बँकिंग सेवा यामध्ये लॉग इन करून किंवा अन्यथा ॲक्सेस करून किंवा त्यांचा वापर करून वरील अटी व शर्ती याबद्दलचे त्याचे ज्ञान आणि स्वीकृती दर्शविली पाहिजे. ग्राहक उपरोक्त कोणत्याही अटी किंवा शर्तीशी सहमत नसल्यास, ग्राहकाने वेबसाईटवर लॉग इन करण्यासह ॲक्सिस बँकेच्या ग्राहक इंटरनेट बँकिंग सर्व्हिस याचा इतर कोणत्याही प्रकारे वापर करू नये किंवा वापर करण्याचा प्रयत्न करू नये.

**ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधेची समाप्ती**

- वापरकर्ता बँकेला किमान 15 दिवसांची लिखित सूचना देऊन कधीही ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधा बंद करण्याची विनंती करू शकतो. अशी ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधा रद्द होण्यापूर्वी ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगद्वारे वापरकर्त्याच्या ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग खाते वर केलेल्या कोणत्याही व्यवहारासाठी वापरकर्ता जबाबदार राहील

  - सबस्क्रिप्शन आधारित सुविधांसाठी, एकदा सबस्क्रिप्शन घेतल्यावर वापरकर्ता ती सुविधा रद्द करू शकत नाही; आणि वापरकर्त्याने ॲक्सिस बँकेची इंटरनेट बँकिंग सुविधा पूर्णपणे बंद करायची ठरवली तरीही, कोणत्याही परिस्थितीत परतावा दिला जाणार नाही. सबस्क्रिप्शनवर कोणतेही स्वयंचलित नूतनीकरण उपलब्ध नाही.

  - बँक, परिस्थितीनुसार वापरकर्त्याला वाजवी नोटीस देऊन, ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग सुविधा कधीही काढून घेऊ शकते

- वापरकर्त्याद्वारे सर्व ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग खाती बंद केल्याने सुविधा आपोआप सुपंष्टात येईल
- वापरकर्त्याने या अटी व शर्तींचा भंग केल्यास किंवा वापरकर्त्याचा मृत्यू, दिवाळखोरी किंवा कायदेशीर अक्षमतेची माहिती बँकेला मिळाल्यास, बँक पूर्वसूचनेशिवाय इंटरनेट बँकिंग सुविधा स्थगित किंवा बंद करू शकते. या कलम 15 च्या अधीन राहून, ॲक्सिस बँकेला 30 दिवसांची पूर्वसूचना देऊन कोणत्याही वेळी सर्व किंवा कोणत्याही सेवा बंद करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे; तथापि, ग्राहकाने अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यामुळे किंवा वापरकर्त्याचा मृत्यू, दिवाळखोरी किंवा कायदेशीर पात्रतेचा अभाव याबाबत माहिती मिळाल्याच्या परिणामी जर बँकेने सेवा बंद केल्या असतील, तर अशा परिस्थितीत पूर्वसूचना देणे आवश्यक राहणार नाही.
- ग्राहकाचे खाते बंद केल्याने सेवा समाप्त होईल.
- या संदर्भात दुसऱ्या पक्षाला 30 दिवसांची पूर्वसूचना देऊन येथे प्रदान केलेल्या सेवा रद्द करण्याचा अधिकार ग्राहकाला आहे.
- सेवा समाप्तीमुळे किंवा बंद केल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी, दाव्यांसाठी, तोट्यासाठी, कोणत्याही प्रकारच्या खर्चासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

**सर्वसाधारण**

या करारातील कलमांची शीर्षके केवळ सोयीसाठी दिलेली आहेत आणि संबंधित कलमांच्या अर्थावर त्यांचा कोणताही परिणाम करत नाही. वापरकर्ता हा करार इतर कोणालाही हस्तांतरित करू शकणार नाही. बँक या कराराअंतर्गत तिच्या कोणत्याही जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी उपकरार करू शकते आणि अभिकर्त्यांची नियुक्ती करू शकते.

**व्यवहार मर्यादा**

ॲक्सिस बँक वेळोवेळी त्यांच्या विविध सेवांसाठी कमाल आणि किमान व्यवहार मर्यादा निर्दिष्ट करू शकते. ॲक्सिस बँकेने लादलेल्या अशा मर्यादांचे पालन करण्यास ग्राहक बांधील असेल.

**माहितीमधील बदल**

ग्राहकाने प्रदान केलेल्या माहितीतील कोणतेही बदल ग्राहकाने ॲक्सिस बँकद्वारे निर्धारित पद्धतीने ॲक्सिस बँकेला ग्राहकाच्या निराकरणासह सूचित केले जातील. ग्राहकला वेळोवेळी ॲक्सिस बँकेला या संदर्भात पत्र देऊन, ग्राहकांच्या निराकरणासह, वापरकर्त्यांची यादी सुधारित करण्याचा, जोडण्याचा आणि/किंवा हटवण्याचा अधिकार असेल. असा कोणताही बदल ॲक्सिस बँकेने ग्राहकाला त्या बदलांच्या अंमलबजावणीबद्दल सूचित केल्यानंतरच प्रभावी ठरेल; आणि तोपर्यंत, ॲक्सिस बँकेकडे उपलब्ध असलेल्या तत्कालीन वापरकर्त्याच्या यादीतील ग्राहकाच्या कोणत्याही प्रतिनिधीकडून प्राप्त झालेल्या सूचना बँक स्वीकारणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे सुरू ठेवेल.

**अनपेक्षित घटना**

“या अटी आणि शर्तींमध्ये याच्या विरुद्ध काहीही नमूद असले तरीही, दैवी कृती, वीज पडणे, पूर, दुष्काळ, भूकंप, भूस्खलन, हरिकेन, सायक्लोन, टायफून, टॉर्नेडो, महामारी/साथीचे रोग, दुष्काळ, गेल्या 100 वर्षांच्या सांख्यिकीय प्रमाणापेक्षा जास्त अत्यंत प्रतिकूल हवामान, आग, स्फोट, रासायनिक किंवा किरणोत्सर्गी प्रदूषण, किरणोत्सर्ग, ज्वालामुखीचा उद्रेक, दंगल किंवा नागरी अशांतता, युद्ध (घोषित असो वा नसो), सार्वजनिक शत्रुत्वाची कृती , दहशतवादी कृत्य, लष्करी कारवाई, सरकारने जाहीर केलेला लॉकडाऊन किंवा नियामक आदेश/अधिसूचना, शासन किंवा इतर प्राधिकरणांची कोणतीही अन्य कारवाई, न्यायालयीन आदेश, उद्योगव्यापी / प्रादेशिक / राष्ट्रीय पातळीवरील संप, टाळेबंदी, कामाच्या नियमांनुसार काम करणे, कामाचा वेग कमी करणे किंवा तत्सम कामगार कारवाई, वीजपुरवठा किंवा इतर अत्यावश्यक पुरवठ्याचा व्यापक बिघाड, तांत्रिक बिघाड, अपघाती किंवा तांत्रिक किंवा विद्युत बिघाड, कॉम्प्युटर/नेटवर्क बिघाड, कोणतेही पैसे हस्तांतरण, पेमेंट गेटवे किंवा कोअर बँकिंग सिस्टीम मधील बिघाड किंवा बँकेच्या नियंत्रणाबाहेरील इतर कोणत्याही कारणांमुळे (ज्याला ' अपरिहार्य घटना ' घटना मानले जाईल) जर बँक आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास असमर्थ ठरली किंवा उशीर झाला, तर बँक कोणत्याही परिस्थितीत त्याला जबाबदार राहणार नाही. बँक आपल्या विवेकाधिकारात सेवा सुरू ठेवू शकते, किंवा सेवा आणि/किंवा हा करार स्थगित किंवा समाप्त करू शकते; आणि यासाठी बँकेवर कोणताही अतिरिक्त खर्च किंवा दायित्व येणार नाही. अपरिहार्य घटनेमुळे बँकेने सेवा आणि/किंवा हा करार स्थगित किंवा समाप्त केल्यास, अशा स्थगिती

किंवा समाप्तीच्या तारखेपर्यंत या कराराच्या अनुषंगाने प्रदान केलेल्या सेवांसाठी जमा झालेली फी प्राप्त करण्याचा अधिकार बँकेला असेल"

**एमआयएस/रिपोर्ट्स**

बँक विवेकबुद्धीनुसार, या सुविधा/सुविधांशी/सेवांशी संबंधित डाटा, विवरण आणि अहवाल सह माहिती क्लायंटला (a) क्लायंटने दिलेल्या पत्त्यावर इलेक्ट्रॉनिक मेलद्वारे किंवा (b) एसएमएस सह इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देऊ शकते. क्लायंटला हे माहित आहे की अशी माहिती गोपनीय स्वरूपाची असेल आणि असे प्रसारण होत असताना कोणत्याही व्यक्तीकडून ती माहिती रोखली जाऊ शकते. वाचली जाऊ शकते, सुधारित केली जाऊ शकते किंवा बदलली जाऊ शकते आणि इंटरनेट संप्रेषण वेळेवर, सुरक्षित, त्रुटी किंवा व्हायरस-मुक्त असल्याची हमी देता येत नाही. बँक कोणताही विलंब, त्रुटी किंवा चुका यासाठी जबाबदार राहणार नाही आणि इंटरनेटवरून पाठवल्या जाणाऱ्या अशा माहितीमुळे होणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा त्या परिणामी झालेल्या नुकसानासाठी बँक जबाबदार राहणार नाही. मग ते बँक किंवा इतर तृतीय पक्षाकडून झाले असेल.

**तृतीय-पक्षाची लिंक**

प्लॅटफॉर्मवर तिसऱ्या पक्षाच्या वेबसाइट्स, ॲप्लिकेशन्स, सेवा आणि संसाधनांचे संदर्भ किंवा लिंक्स असू शकतात; परंतु याचा अर्थ असा नाही की आम्ही अशा माध्यमांचे समर्थन करत आहोत. आम्ही या लिंक्स केवळ वापरकर्त्याच्या सोयीसाठी आणि काही सेवांचा लाभ घेण्यासाठी उपलब्ध करून देतो. तृतीय पक्षाच्या सेवांच्या अचूकता, विश्वसनीयता, परिणामकारकता किंवा वैधतेबाबत बँक कोणत्याही प्रकारची हमी किंवा आश्वासन देत नाही; आणि परिणामी, तृतीय पक्षाच्या सेवांकडून उपलब्ध होणारे साहित्य, उत्पादने किंवा सेवांसाठी बँक जबाबदार असणार नाही. वापरकर्ता कोणत्याही तृतीय पक्षाच्या सेवांच्या वापरास लागू असलेल्या अटी व शर्ती आणि गोपनीयता धोरण वाचण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी जबाबदार आहे; आणि वापरकर्ता हे मान्य करतो की, अशा सेवांच्या वापरामुळे उद्भवणाऱ्या सर्व जोखमींची आणि परिणामांची संपूर्ण जबाबदारी त्याची स्वतःची असेल.

**संबंध**

तुम्ही हे समजता आणि मान्य करता की, या अटींमधील कोणत्याही बाबीचा अर्थ वापरकर्ता आणि निओ फॉर बिझनेस यांच्यात भागीदारी किंवा संयुक्त उपक्रम निर्माण झाला आहे असा घेतला जाणार नाही; तसेच, कोणत्याही पक्षाला दुसऱ्या पक्षाच्या कर्जासाठी किंवा कायदेशीर दायित्वासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार धरले जाणार नाही.

**परिशिष्ट 1 - पेमेंट्स (वरील नोंदणीच्या अटी व शर्तींमध्ये विस्तार)**

**निधी हस्तांतरण**

वापरकर्ता संबंधित अकाउंटमध्ये पर्याप्त बॅलन्स नसताना किंवा बँकेसोबत ओव्हरड्राफ्ट मंजुरीसाठी पूर्वनिर्धारित करार नसताना ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगचा वापर किंवा प्रयत्न करू शकणार नाही. वापरकर्त्याच्या खात्यात पुरेशी रक्कम उपलब्ध असल्यास, ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंगद्वारे प्राप्त झालेले निधी हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करण्याचा बँक प्रयत्न करेल. बँकेच्या वाजवी नियंत्रणाबाहेरील परिस्थितींमुळे सर्व किंवा कोणतेही पेमेंट न केल्यास किंवा पेमेंटध्ये विलंब झाल्यास बँक जबाबदार असणार नाही.

**बिल पेमेंट्स***

वापरकर्त्याने बिल पेमेंट सुविधेअंतर्गत, नियोजित तारखेला बिलांचा भरणा करण्यासाठी खात्यात पुरेशी रक्कम ठेवणे आवश्यक आहे. खात्यातील अपुरी शिल्लक किंवा बँकेच्या वाजवी नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे - ज्यामध्ये नेटवर्क कनेक्टिव्हिटीच्या तांत्रिक समस्या, संगणक बिघाड, संप्रेषण लिंकची अनुपलब्धता, प्रणाली देखभाल/डाऊन-टाईम, पेमेंट प्रणालीतील त्रुटी इत्यादींचा समावेश आहे, परंतु ते केवळ इतक्याच कारणांपुरते मर्यादित नाही - वापरकर्त्याच्या बिलांचा भरणा न झाल्यास बँक जबाबदार असणार नाही.

बँक कोणत्याही प्रकारे, वापरकर्त्याच्या बिलांचा भरणा विहित वेळेत किंवा नियोजित तारखेला न झाल्यास जबाबदार असणार नाही; आणि अशा न भरलेल्या बिलांमुळे उद्भवणारे व्याज, दंड किंवा इतर कोणतेही शुल्क भरण्यासाठी केवळ वापरकर्ताच बांधील असेल. तसेच, वापरकर्त्याच्या बिलांचा भरणा विहित वेळेत किंवा नियोजित तारखेला न झाल्यामुळे बँकेला सोसावे लागलेले कोणतेही नुकसान, खर्च, शुल्क किंवा कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यांबाबत वापरकर्ता बँकेची

नुकसानभरपाई करेल; आणि वापरकर्ता हे मान्य करतो की, अशा परिस्थितीत तो बँकेकडून नुकसानभरपाईची मागणी करणार नाही.

अतिरिक्त बिलिंग, सेवा किंवा सुविधा खंडित होणे, बँकेकडून चुकीचे क्रेडिट किंवा डेबिट होणे यांसारखे सर्व विवाद केवळ वापरकर्त्याद्वारेच सोडवले जातील; आणि बँक कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारे त्यासाठी उत्तरदायी किंवा जबाबदार असणार नाही.

[* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू.]

**बल्क पेमेंट सेवा**

1. पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्युल ही बँकेद्वारे प्रदान केलेली वेब-आधारित पेमेंट सेवा आहे, ज्यामध्ये वापरकर्ता बँकेला त्याच्या खात्यातून ठराविक लाभार्थ्यांना निधी हस्तांतरित करण्याची विनंती करू शकतो. हे हस्तांतरण वापरकर्त्याने बँकेला पुरवलेल्या माहितीच्या आधारे (इंटरनेटद्वारे फाईल्स अपलोड करून) आणि वापरकर्त्याने विहित केलेल्या अटींनुसार केले जाते.

2. बँकेद्वारे वेळोवेळी ठरविण्यात येणाऱ्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, वापरकर्ता बँकेच्या विविध उत्पादनांसाठी सिंगल अपलोड सुविधा अंतर्गत पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूल सेवेचा लाभ घेऊ शकतो. पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूल अंतर्गत बँकेद्वारे वेब-आधारित पेमेंट सेवा, म्हणजेच निधी हस्तांतरण, आयएमपीएस, एनईएफटी, आरटीजीएस, उपलब्ध करून देण्यात आलेल्या असून, वापरकर्ता आपल्या गरजेनुसार व वापरकर्त्याच्या खात्यात पुरेशी व स्पष्ट शिल्लक उपलब्ध असल्याच्या अधीन राहून, या सेवांचा लाभ घेऊ शकतो.

3. वापरकर्त्याला पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्युलवर इंटरनेटद्वारे फाईल्स अपलोड करणे आवश्यक आहे आणि फाईल अपलोड करण्याच्या प्रक्रियेचा सविस्तर कार्यपद्धती वापरकर्त्यासाठी खाली नमूद केला आहे. सदर प्रक्रियेमध्ये कोणत्याही विचलनास परवानगी दिली जाणार नाही आणि पेमेंट सेवेचा लाभ घेण्यासाठी वापरकर्त्याला ती प्रक्रिया जशीच्या तशी पाळणे आवश्यक असेल.

4. वापरकर्ता याद्वारे बँकेला, खाली नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार वापरकर्त्याने अपलोड केलेल्या डेटा फाईल्सच्या आधारावर, त्याच्या वतीने आरटीजीएस/एनईएफटी/निधी हस्तांतरण/आयएमपीएस व्यवहार पूर्ण करण्याचे अधिकार प्रदान करत आहे. वापरकर्ता हमी देतो की, नेटवर्क/इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या तांत्रिक समस्या, संगणक बिघाड, संप्रेषण लिंकची अनुपलब्धता, प्रणालीची देखभाल /डाऊन-टाईम, पेमेंट प्रणालीतील त्रुटी इत्यादींमुळे होणाऱ्या कोणत्याही अपयशासाठी किंवा विलंबासाठी तो बँकेला कोणत्याही प्रकारे जबाबदार धरणार नाही; परंतु अट अशी आहे की, असे अपयश बँकेच्या वाजवी नियंत्रणाबाहेर असावे आणि ते बँकेच्या घोर आणि हेतुपुरस्सर निष्काळजीपणामुळे झालेले नसावे.

5. वापरकर्ता अशी हमी देतो की, डेटा फाईल्स केवळ अधिकृत व्यक्तीद्वारेच अपलोड केल्या जातील; आणि वापरकर्ता या अधिकाराचा पुरावा म्हणून संचालक मंडळाच्या ठरावाची एक प्रत बँकेला सादर करेल. सर्व संबंधित खाते प्रकारांच्या संदर्भात, अधिकृत व्यक्तीच्या स्वाक्षऱ्या बँकेकडील वापरकर्त्याच्या खात्यांमध्ये देखील अद्ययावत केल्या जातील.

6. या अटी व शर्तींमध्ये बँकेच्या विरोधात कोणतीही अप्रत्यक्ष कर्तव्ये किंवा दायित्वे कोणत्याही प्रकारे समाविष्ट आहेत असे वाचले जाणार नाही किंवा मानले जाणार नाही. येथे अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तींनुसार निधी हस्तांतरित करण्यासाठी पेमेंट सेवा प्रदान करण्याच्या कर्तव्याव्यतिरिक्त, बँक वापरकर्ता आणि/किंवा लाभार्थी यांच्यात झालेल्या कोणत्याही कराराच्या, व्यवस्थेच्या किंवा सामंजस्याच्या कोणत्याही तरतुदींना बांधील असणार नाही.

7. बँक पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्युलवर प्राप्त झालेल्या वापरकर्त्याच्या विनंत्यांवर सद्भावनेने कृती करेल. अशा विनंत्यांची किंवा प्राप्त झालेल्या डेटा फाईल्सची सत्यता आणि/किंवा वैधता आणि/किंवा अधिकृततेची पडताळणी करण्याची जबाबदारी बँकेवर नसेल; आणि अशा विनंत्या किंवा डेटा फाईल्स वापरकर्त्याद्वारे अधिकृत, वैध आणि रीतसर प्रमाणित आहेत, असेच मानले जाईल. वापरकर्ता याद्वारे सहमत आहे की, खाली नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार पेमेंट प्लॅटफॉर्म

मॉड्युलद्वारे बँकेला पुरवलेल्या विनंत्या किंवा डेटा फाईल्सद्वारे तो अपरिवर्तनीयपणे आणि बिनशर्त बांधील असेल; आणि वापरकर्त्याद्वारे पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्युलमध्ये अपलोड झाल्याचे दिसणाऱ्या अशा कोणत्याही विनंत्या किंवा डेटा फाईल्सच्या सत्यतेवर, वैधतेवर किंवा अधिकृततेवर विवाद करण्याचा अधिकार वापरकर्त्याला असणार नाही.

8. वापरकर्ता हमी देतो की, बँकेने प्रदान केलेल्या पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्युलचा वापर केवळ बँकेने निश्चित केलेल्या विशिष्ट हेतूसाठीच केला जाईल.

9. बँकेद्वारे पूर्ण केलेल्या पेमेंट व्यवहारांचा तपशील वापरकर्त्यास प्राप्त होईल आणि सदर तपशीलांची आपण अपलोड केलेल्या डेटा फाईलशी उलट-तपासणी करणे ही वापरकर्त्याची जबाबदारी असेल.

10. जर ऑनलाईन पासवर्ड निर्माण आणि रिसेट सुविधा प्राप्त झाली असेल तर हे समजले जाते की पासवर्ड पाठविण्यासाठी बँक दिलेली ही माहिती रजिस्टर करेल. वापरकर्त्याच्या मोबाइल नंबरमध्ये किंवा ईमेल आयडीमध्ये कोणताही बदल झाल्यास, तो बदल झाल्याबरोबर बँकेला लेटरहेडवर, अधिकृत स्वाक्षरीकर्त्याच्या स्वाक्षरीसह कळवणे आवश्यक असेल (हे केवळ संबंधित सीए संस्थांसाठी लागू आहे; इतरांसाठी प्लॅटफॉर्मवरील 'पासवर्ड विसरला' सुविधेचा वापर करून पासवर्ड रिसेट करता येईल). माहिती उशीराने सादर केल्याच्या बाबतीत किंवा नोंदणीकृत माहिती बदलण्यासाठी बँकेला माहिती सादर न केल्याच्या बाबतीत वापरकर्ता बँकेच्या कृतीसाठी बँकेला नुकसानभरपाई देईल.

**ग्राहकांच्या वतीने फाईल अपलोडसाठी प्रक्रिया प्रवाह**

1. वापरकर्ता इंटरनेटच्या माध्यमातून निओ फॉर बिझनेसमध्ये लॉग-इन करून आणि पेमेंट मॉड्यूलमध्ये जाऊन, कोणत्याही ठिकाणाहून डाटा अपलोड करू शकतो. वापरकर्त्याला पेमेंट मॉड्यूलमध्ये प्रवेश करण्यासाठी लॉग-इन आयडी आणि पासवर्ड प्रदान केला जाईल.

2. वापरकर्त्याद्वारे डाटा थेट पेमेंट मॉड्यूलवर, पूर्व-निर्धारित आणि परस्पर संमती असलेल्या स्वरूपात अपलोड केला जाईल. ग्राहक डेटा एकाच फाईलच्या माध्यमातून अपलोड करू शकतो.

3. ॲक्सिस बँक प्रशासकास वापरकर्ते निश्चित करण्याचे आणि मास्टर संबंधित सर्व क्रिया पार पाडण्याचे अधिकार असतील. आवश्यकता असल्यास, वापरकर्त्यांना देखील स्वतंत्रपणे त्याच क्रिया करण्याचे अधिकार प्रदान केले जाऊ शकतात; परंतु त्यासाठी आवश्यक अधिकार प्राप्त करणे आणि बँकेकडे संबंधित कागदपत्रे सादर करणे अनिवार्य असेल*.

[* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू.]

4. डाटाच्या अचूकतेची खात्री करण्यासाठी वापरकर्त्याच्या स्तरावर 'मेकर आणि चेकर' ही संकल्पना लागू असेल, ज्यामध्ये डेटा अपलोड करणे आणि त्याचे प्रमाणीकरण करणे या प्रक्रियांचा समावेश असेल. मेकर–चेकर संकल्पनेची अंमलबजावणी व देखभाल करण्याची संपूर्ण जबाबदारी वापरकर्त्यावर राहील, आणि वापरकर्त्याच्या स्तरावर मेकर किंवा चेकरकडून सुविधेचा गैरवापर किंवा अनधिकृत वापर झाल्यामुळे उद्भवलेल्या कोणत्याही अनपेक्षित परिणामांसाठी ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.*

[* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू.]

5. निर्धारित अधिकृतता मॅट्रिक्सनुसार, वापरकर्ता फाईल/फाईल्सना अधिकृत किंवा नकार देऊ शकतो. लॉग-इन केलेल्या वापरकर्त्याला निवडलेली फाईल अपलोड करण्याचे अधिकार आहेत की नाही हे तपासण्यासाठी अधिकृतता केली जाते.*

[* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू.]

6. फाईल अपलोड केल्यानंतर, प्रणालीद्वारे पहिल्या स्तराची तपासणी केली जाईल. प्राथमिक स्तरावरील पडताळणी करण्यात येईल, ज्याअंतर्गत पुढील मुद्द्यांची तपासणी केली जाईल:
a. फाईलमधील व्यवहारांची पुनरावृत्ती b. लाभार्थी प्रमाणीकरण आणि त्यावरील मापदंड
c. निधी प्रमाणीकरण
d. आयएफएससी प्रमाणीकरण
e. प्रति फाईल व्यवहारांची एकूण संख्या
f. पेमेंट करण्यासाठी आवश्यक अनिवार्य क्षेत्रांची उपलब्धता

7. कोणत्याही कारणास्तव फाईल नाकारल्यास, प्रणाली फ्रंट-एंडवर नाकारण्याचे कारण दर्शवेल, जे वापरकर्ता दुरुस्त करून सुधारित डेटा पुन्हा अपलोड करू शकतो.

8. अधिकृत फाईल्सवर बँकद्वारे प्रक्रिया केली जाईल म्हणजेच पेमेंट फाईलमध्ये नमूद केलेल्या लाभार्थी खाते क्रमांकावर आधारित निधी हस्तांतरणाशी संबंधित व्यवहार अखंडपणे अंमलात आणले जातील आणि नमूद केलेल्या पेमेंट पद्धतींसाठी वापरकर्त्याने अधिकृत केल्यास एनईएफटी/आयएफटी/आयएमपीएस*/आरटीजीएस* अखंडपणे अंमलात आणले जातील.

[* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू.]

**परिशिष्ट 2 - व्हर्च्युअल अकाउंट कलेक्शन अटी व शर्ती आभासी**

**खाते संकलन घोषणापत्र**

वापरकर्ता यांद्वारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो व पुष्टी करतो की:

1. आम्ही www.axisbank.com वर आभासी खाते संकलन सुविधेच्या माध्यमातून प्रदान केलेल्या रोख व्यवस्थापन सेवांच्या आणि शर्ती वाचल्या आहेत, समजून घेतल्या आहेत आणि याद्वारे त्या आम्हाला मान्य आहेत. आम्ही या अटींचे पालन करण्यास बांधील आहोत.

2. आम्ही समजतो की सदर अटी वेळोवेळी सुधारणेच्या अधीन आहेत आणि आम्ही अशा बदलांबद्दल स्वत:ला अपडेट ठेवण्यास आणि वेळोवेळी लागू असलेल्या अटींनुसार बांधील राहण्यास सहमत आहोत.

3. आम्ही याद्वारे पुष्टी करतो की बँकेला दिलेली सर्व माहिती सत्य आणि अचूक आहे आणि आम्हाला बँकेसोबत एक अनन्य रोख व्यवस्थापन संबंध प्रस्थापित करायचा आहे. येथे सादर केलेली कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, चुकीची किंवा खोटी असल्याचे अथवा बँकेची जाणूनबुजून दिशाभूल करण्याच्या उद्देशाने दिल्याचे कोणत्याही टप्प्यावर बँकेच्या निदर्शनास आल्यास, आभासी खाते संकलन सुविधेअंतर्गत दिलेली सेवा नाकारली जाऊ शकते; तसेच बँकेला सदर सुविधा तात्काळ बंद करण्याचा अधिकार असेल. याशिवाय, बँकेच्या अधिकारांना बाधा न आणता, बँक स्वतंत्र कायदेशीर प्रक्रिया किंवा इतर योग्य कारवाई सुरू करू शकते.

4. आम्ही हे मान्य करतो की, आभासी खाते संकलन सुविधेअंतर्गत वापरकर्त्याचा विनंती अर्ज कोणत्याही

टप्प्यावर स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार बँकेकडे असेल आणि यावर बँकेचा निर्णय अंतिम राहील.

5. आम्हाला हे मान्य आहे की, बँकेच्या अंतर्गत धोरणांनुसार काही विशिष्ट निकष आणि पात्रतेच्या आधारावरच आभासी खाते संकलन सुविधेअंतर्गत रोख व्यवस्थापन सेवा प्रदान करण्याचे अधिकार बँक राखून ठेवते.

6. आम्ही याद्वारे मान्य करतो की, ॲक्सिस बँक रोख व्यवस्थापन सेवेअंतर्गत आभासी खाते संकलन सुविधेच्या अटी आणि शर्ती प्राप्त करणे, त्या वाचणे आणि समजून घेणे ही आमची जबाबदारी आहे आणि वेळोवेळी सुधारित होणाऱ्या सदर अटी व शर्तींचे पालन करण्याचे आम्ही याद्वारे मान्य करतो.

7. आम्ही समजतो आणि मान्य करतो की, आभासी खाते संकलन सुविधा अंतर्गत बँकेच्या रोख व्यवस्थापन सेवांचा वापर केल्यास, ते संबंधित अटी व शर्तींचा बिनशर्त आणि अपरिवर्तनीय स्वीकार मानले जाईल.

8. आम्ही वेळोवेळी बँकेने निर्धारित केलेले कोणतेही शुल्क/फी भरण्यास आणि योग्य पत्रव्यवहाराद्वारे सूचित करण्यास सहमत आहोत. विनंती करताना प्रदान केलेली सर्व माहिती थेट/अप्रत्यक्षपणे पडताळण्याचा आणि संदर्भ शोधण्याचा बँक अधिकार राखून ठेवते.

9. आम्ही बँक अधिकाऱ्याकडून फोन/ईमेल/एसएमएस/थेट संवादाद्वारे वेळोवेळी बँकद्वारे सादर केलेल्या किंवा ऑफर केलेल्या नवीन उत्पादने, सेवा आणि वैशिष्ट्यांविषयी माहिती स्वीकारण्यास सहमत आहोत.

10. आम्ही हे मान्य करतो आणि आम्हाला हे समजते की, आभासी खाते संकलन सुविधेअंतर्गत मिळणाऱ्या रोख व्यवस्थापन सेवांसाठी, निधीचा निपटारा त्याच दिवशी (टी दिवस) केला जाईल; जो आरबीआयच्या आरटीजीएस/एनईएफटी/आयएमपीएस निधी निपटारा मानकांनुसार असलेल्या मानक वेळेनुसार नसू शकतो.

**परिशिष्ट 3 - सेवा विनंती**

1. मोबाइल नंबर अपडेशन: खात्याशी संबंधित कोणताही संवाद तसेच व्यवहार सल्ला पाठविण्यासाठी बँक रेकॉर्डमध्ये मोबाईल नंबर अपडेट केला जाऊ शकतो. बँकेला योग्य वाटेल त्यानुसार, कोणत्याही व्यवहाराच्या सत्यतेची पडताळणी करण्यासाठी आवश्यक त्या पडताळणी, कॉल बॅक किंवा तपासणी करण्यासाठी अद्ययावत केलेल्या नंबरवर संपर्क साधण्याचे अधिकार वापरकर्ता याद्वारे बँकेला देत आहे. वापरकर्ता अशी पुष्टी करतो की, नमूद केलेला मोबाईल नंबर त्यांनी स्वतः दिलेला आहे आणि तो कोणत्याही तृतीय पक्षाद्वारे वापरला जात नाही. वापरकर्ता असे आश्वासन देतो की, मोबाइल नंबर बदलल्यास ते त्याबद्दल बँकेला रीतसर आणि त्वरित सूचित करतील.

2. स्कीम कोड रूपांतरण: वापरकर्त्याने निवडलेल्या नवीन स्कीम कोडशी संबंधित वैशिष्ट्ये आणि शुल्काची रचना वाचली आणि समजून घेतली आहे. सदर बदल पुढील शुल्क चक्रापासून लागू होतील, जे पुढील महिन्याच्या 1 तारखेपासून प्रभावी असतील.

3. ई-मेल आयडी अद्ययावत करणे: खाते स्तरावर ई-मेल आयडी अद्ययावत केला जाऊ शकतो. बँकेकडून खात्याचे विवरणपत्र तसेच इतर सर्व संवाद या नोंदणीकृत ई-मेल आयडीवर पाठविण्यात येतील. वापरकर्त्याला याची पूर्ण कल्पना आहे की, ई-मेल आयडी अद्ययावत केल्यानंतर, बँकेकडून खाते विवरणपत्राची छापील प्रत पाठवणे बंद केले जाईल.

4. चेकबुक विनंती*:

वापरकर्ता चेकबुक जारी करण्याची विनंती करू शकतो. वापरकर्त्याच्या नोंदणीकृत पत्त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही पत्त्यावर चेक बुक पाठवण्यासाठी लागणारे कुरिअर शुल्क वापरकर्त्याला द्यावे लागेल. सदर शुल्क बँकेच्या दरपत्रकामध्ये

नमूद केल्यानुसार आणि वेळोवेळी वेबसाईटवर अद्ययावत केल्याप्रमाणे असेल.

व्यवहार प्रक्रिया (बँकेद्वारे जेव्हा आणि जसे सुरू केली जाईल)

- सर्व तत्काळ आर्थिक व्यवहारांसाठीच्या विनंती तत्काळ अमलात आणल्या जातील.
- वापरकर्त्याने सूचना पाठवलेली असूनही, ती कोणत्याही कारणास्तव बँकेला प्राप्त न झाल्यास आणि त्यामुळे संबंधित व्यवहारावर प्रक्रिया न झाल्यास/ तो व्यवहार पूर्ण न झाल्यास, वापरकर्ता बँकेला जबाबदार धरणार नाही.
- वापरकर्ता लागू असलेले चेक बुक शुल्क देण्यास सहमत आहे आणि सदर शुल्क त्याच्या/तिच्या खात्यातून वजा केले जाईल

[* बँकेद्वारे या सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लागू.]

**परिशिष्ट 4 - डील्स मिळवा अटी व शर्ती**

या अटी आणि शर्ती (“अटी”) या ऑफरमध्ये (ज्याची व्याख्या पुढे दिली आहे) सहभागी होणाऱ्या अशा वापरकर्त्यास (ज्याची व्याख्या पुढे दिली आहे) लागू असतील, जो या अटींचे पालन करण्यास सहमत आहे; तसेच या अटी ॲक्सिस बँकेद्वारे ("ॲक्सिस बँक") प्रदान करण्यात येणाऱ्या विशिष्ट उत्पादनांच्या आणि सेवांच्या तरतुदींचे नियमन करतील. या ऑफरमध्ये सहभाग स्वैच्छिक आहे. ऑफरमध्ये सहभागी होणाऱ्या कोणत्याही वापरकर्त्याने या अटी आणि शर्ती वाचल्या, समजून घेतल्या आणि स्वीकारल्या आहेत असे मानले जाईल. या अटी, वापरकर्त्याकडे असलेल्या बँकेच्या कोणत्याही खात्याच्या किंवा इतर कोणत्याही सुविधा/सेवांच्या लागू अटी व शर्तींव्यतिरिक्त असतील आणि त्या इतर कोणत्याही अटींचे उल्लंघन करणार नाहीत.

ॲक्सिस बँक ग्रॅब डील्स हे केवळ एक प्लॅटफॉर्म असून, त्यावर संलग्न भागीदारांकडून वापरकर्त्यांना देण्यात येणाऱ्या ऑफर प्रदर्शित केल्या जातात. वापरकर्त्यांच्या सोयीसाठी, संलग्न भागीदारांनी देऊ केलेल्या ऑफर्स प्रदर्शित करण्याच्या उद्देशाने ॲक्सिस बँकेने केवळ ग्रॅब डील्स या प्लॅटफॉर्मचे होस्टिंग केले आहे . संबंधित उत्पादने/सेवा केवळ संलग्न भागीदारांद्वारेच दिल्या जात आहेत आणि ॲक्सिस बँक यापैकी कोणत्याही उत्पादनांची विक्री करत नाही किंवा सेवा प्रदान करत नाही. ॲक्सिस बँक 'ग्रॅब डील्स' प्लॅटफॉर्मचे होस्टिंग करून कोणताही B2B चा व्यवसाय किंवा ऑनलाइन किरकोळ व्यापार अथवा शॉपिंगचा व्यवसाय करत नाही. संलग्न भागीदारांनी उपलब्ध करून दिलेल्या ऑफर्स पाहिल्याबद्दल किंवा त्यांनी देऊ केलेली उत्पादने/सेवा खरेदी केल्याबद्दल किंवा त्यांचा लाभ घेतल्याबद्दल ॲक्सिस बँक वापरकर्त्यांकडून कोणतेही कमिशन किंवा शुल्क आकारणार नाही; तथापि, क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/नेट बँकिंग सुविधेच्या वापरासाठी लागणारे नेहमीचे शुल्क यास अपवाद असेल. वापरकर्ता इतर कोणत्याही दुकानातून किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून आणि कोणत्याही इतर पेमेंट पर्यायाचा वापर करून उत्पादने खरेदी करण्यास किंवा सेवांचा लाभ घेण्यास स्वतंत्र आहे. ॲक्सिस बँक केवळ पेमेंट गेटवे सेवा पुरवून आपल्या वापरकर्त्यांना व्यवहार पूर्ण करण्यास सुलभता निर्माण करून देत आहे. ग्रॅब डील्स प्लॅटफॉर्म होस्ट करून, ॲक्सिस बँक संलग्न भागीदारांनी दिलेल्या ऑफर्सच्या संदर्भात कोणतीही खात्री देत नाही, कोणतीही हमी देत नाही किंवा त्याबाबत कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. ॲक्सिस बँक कोणत्याही संलग्न भागीदाराचे किंवा कोणत्याही उत्पादनाचे/सेवेचे समर्थन करत नाही; तसेच या ऑफर/सवलतींतर्गत असलेल्या उत्पादनांच्या/सेवांच्या विक्रीसाठी, गुणवत्तेसाठी किंवा वैशिष्ट्यांसाठी बँक जबाबदार नाही. ॲक्सिस बँक ग्रॅब डील्सच्या वेबसाइटवर (किंवा ज्या विभागाकडे तुम्हाला निर्देशित केले जाईल तिथे) संलग्न भागीदारांबाबत किंवा देऊ केलेल्या उत्पादनां/सेवांबाबत असलेली कोणतीही माहिती ॲक्सिस बँकेद्वारे पडताळली गेलेली नाही. अशा कोणत्याही माहितीसाठी ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही. कोणत्याही ऑफरअंतर्गत वापरकर्त्याने कोणतेही उत्पादने/सेवा खरेदी केली /त्याचा लाभ घेतल्यास, त्याबाबत ॲक्सिस बँक कोणतीही जबाबदारी किंवा उत्तरदायित्व स्वीकारणार नाही. तुम्ही एखादे उत्पादन खरेदी करण्याचे किंवा सेवेचा लाभ घेण्याचे ठरवल्यास, ॲक्सिस बँक अशा खरेदीमध्ये किंवा व्यवहारामध्ये कोणत्याही प्रकारे सहभागी नसेल, तसेच त्याशी संबंधित नसेल; आणि संलग्न भागीदाराच्या किंवा वापरकर्त्याच्या कोणत्याही कृतीसाठी किंवा त्रुटीसाठी बँक कायदेशीररीत्या बांधील किंवा जबाबदार असणार नाही. उत्पादन किंवा सेवेच्या संदर्भातील सर्व शंका/तक्रारींचे निवारण केवळ संबंधित संलग्न भागीदाराद्वारेच केले जाईल. ग्राहकाला ग्रॅब डील्स प्लॅटफॉर्मद्वारे सवलत/ऑफर प्राप्त होतील. ग्रॅब डील्स व्यतिरिक्त इतर अस्तित्वात असलेल्या ऑफर्स देखील लागू होतील, मात्र त्यासाठी वापरकर्त्याने संबंधित ऑफर्सच्या अटी आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

grabdeals.axisbank.com ही वेबसाइट व्हर्नोस्ट मार्केटिंग टेक्नॉलॉजी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडद्वारे संचलित आणि देखरेख केली जाते. (“व्हर्नोस्ट” – जी ॲक्सिस बँकेच्या वतीने काम करते; ही कंपनी भारतीय कायद्यांनुसार स्थापित

आणि अस्तित्वात असलेली संस्था आहे). खालील अटी आणि शर्ती या वेबसाइटच्या सर्व अभ्यागतांना किंवा वापरकर्त्यांना लागू होतात.

कृपया ही वेबसाईट वापरण्यापूर्वी या साईटच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचा. ही वेबसाईट ॲक्सेस करून किंवा वापरून, तुम्ही स्पष्टपणे या साईटच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास आणि बांधील राहण्यास सहमत आहात. जेव्हा तुम्ही या साइटद्वारे कोणत्याही उप-साइटवर (ती कंपनीच्या 'सहयोगी' संस्थेची असो किंवा अन्य कोणाची) प्रवेश करता, तेव्हा त्या उप-साइटचे स्वतःचे स्वतंत्र नियम आणि अटी असू शकतात, जे विशेषतः त्याच उप-साइटसाठी लागू असतील.

वापराच्या या अटी व शर्ती आणि या साइटवर पोस्ट केलेल्या इतर कोणत्याही अतिरिक्त अटी, एकत्रितपणे ॲक्सिस बँक आणि तुमच्यामधील या साइटच्या वापरासंबंधीचा संपूर्ण करार मानले जातील.

**व्याख्या:**

जोपर्यंत संदर्भाच्या विसंगत असत नाही तोपर्यंत खालील शब्द आणि वाक्यांशांचा अर्थ या कागदपत्रात खाली स्थापित केल्यानुसार असेल:

**"वापरकर्ता"** म्हणजे अशी व्यक्ती जिचे ॲक्सिस बँकेत चालू खाते आहे आणि जी ग्रॅब डील्स बिझनेस प्लॅटफॉर्मद्वारे ऑफर्सचा लाभ घेते किंवा खरेदी करते.

**"ऑफर"** म्हणजे अशा सवलती, ज्या ॲक्सिस बँक वापरकर्त्याला, खालील ऑफरच्या अटींमध्ये नमूद केलेल्या विशिष्ट अटींच्या आधारे, grabdeals.axisbank.com द्वारे यशस्वीरित्या व्यवहार पूर्ण केल्यावर प्रदान करेल.

**"संलग्न भागीदार"** म्हणजे ग्रॅब डील्सप्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध केलेले व्यापारी/ब्रँड/B2B भागीदार असा अर्थ असेल.

कॅशबॅक*/सवलत ऑफरच्या अटी व शर्ती :

- ऑफर केवळ ॲक्सिस बँक खातेधारक आणि ॲक्सिस बँक क्रेडिट कार्ड धारकांसाठी वैध आहे.
- ॲक्सिस बँक सीए धारकांसाठी सवलत % वैध आहे.
- ही ऑफर वापरकर्त्याने ॲक्सिस बँक क्रेडिट किंवा डेबिट कार्ड (प्रमाणीकरण पृष्ठावर वापरकर्त्याद्वारे निर्दिष्ट) वापरून संलग्न साईटवर व्यवहार केला असेल तरच वापरकर्त्यास लागू आहे. जर वापरकर्त्याने अन्य कोणत्याही कार्डचा वापर करून व्यवहार केला असेल (प्रमाणीकरण पृष्ठावर वापरकर्त्याने नमूद केलेल्या कार्डव्यतिरिक्त), तर कॅशबॅक/रिवॉर्ड पॉइंट्स लागू होणार नाहीत.
- ऑफर केवळ ॲक्सिस रिटेल ग्राहकांसाठी वैध आहे. व्यवसाय/व्यवसाय प्रतिनिधी यांच्या माध्यमातून करण्यात आलेले किंवा संशयास्पद स्वरूपाचे कोणतेही व्यवहार पात्र ठरणार नाहीत.
- ग्रॅब डील्स प्लॅटफॉर्मद्वारे व्यवहार करून वापरकर्ता प्रति कॅलेंडर महिना, प्रति खाते/क्रेडिट कार्ड जास्तीत जास्त ₹ 1000/- रुपयांपर्यंत कॅशबॅक मिळवू शकतो.
- व्यवहाराच्या तारखेपासून 90 ते 120 दिवसांच्या आत कॅशबॅक वापरकर्त्याच्या मूळ पेमेंट पद्धतीमध्ये (डेबिट किंवा क्रेडिट कार्ड) जमा केला जाईल.
- कर वगळून उत्पादनाच्या मूलभूत किंमतीवर कॅशबॅकची गणना केली जाते
- ऑफर केवळ कोणत्याही सहयोगी भागीदाराव्दारे खरेदी केलेल्या एका मोबाइल फोनसाठी (प्रति डेबिट किंवा क्रेडिट कार्ड) लागू असेल. ही ऑफर त्या कॅलेंडर महिन्यात खरेदी केलेल्या दुसऱ्या मोबाइलवर लागू नाही. वापरकर्त्याने ग्रॅब डील्स प्लॅटफॉर्मद्वारे दोन मोबाइल फोन खरेदी केल्यास, ही ऑफर केवळ पहिल्या खरेदी केलेल्या मोबाइलसाठीच (सर्व सहयोगी भागीदार मिळून) लागू होईल.
- या ऑफरमध्ये सहभागी होऊन, वापरकर्ता या ऑफरच्या अटी व शर्तींचे तसेच ॲक्सिस बँकेद्वारे वेळोवेळी सुधारित आणि विहित केलेल्या इतर कोणत्याही लागू अटी व शर्तींचे पालन करण्यास बांधील असल्याचे मान्य करतो. वापरकर्त्याद्वारे अशा कोणत्याही सहभागाचा अर्थ असा असेल की वापरकर्त्याने येथे या अटी व शर्ती वाचल्या आहेत, समजल्या आहेत आणि स्वीकारल्या आहेत.

- ॲक्सिस बँक ग्रॅब डील्स पृष्ठावरून संलग्न भागीदाराच्या वेबसाइटवर गेल्यावर लगेच कार्टमध्ये समाविष्ट केलेल्या वस्तूंवरच ॲक्सिस बँक डेबिट आणि क्रेडिट कार्डवरील कॅशबॅक लागू होईल. वापरकर्त्याच्या कार्टमध्ये आधीपासूनच असलेल्या (मागील सत्रात समाविष्ट केलेल्या) वस्तूंवर ही ऑफर लागू होणार नाही; केवळ ॲक्सिस बँक ग्रॅब डील्स प्लॅटफॉर्मवरून पोहोचल्यानंतर नव्याने समाविष्ट केलेल्या वस्तूंवरच ही ऑफर लागू होईल.

- Amazon Pay बॅलन्स टॉप-अप करणे, Amazon Prime किंवा Audible Music सदस्यत्व खरेदी करणे, विमान व चित्रपट तिकीट बुकिंग, बिल पेमेंट आणि रिचार्ज, तसेच ग्रॅब डील्स प्लॅटफॉर्मद्वारे सोने आणि चांदीची नाणी खरेदी करणे यांसाठी ही ऑफर लागू असणार नाही.

- ही ऑफर इतर कोणत्याही व्यक्तीला हस्तांतरित करण्यायोग्य नाही आणि इतर कोणत्याही ऑफरसह एक्सचेंज केली जाऊ शकत नाही.

- ही ऑफर अहस्तांतरणीय, अभिहस्तांकनास न येण्याजोगी आणि बिगर वाटाघाटीपात्र असून, त्या बदल्यात रोख रक्कम मिळवता येणार नाही

- ही ऑफर केवळ भारतीय नागरिक असलेल्या वापरकर्त्यांसाठीच लागू आहे

- अनिवासी भारतीय ग्राहकांना त्यांच्या एनआरई खात्याच्या डेबिट कार्डवर ही ऑफर लागू होणार नाही

- ही ऑफर केवळ प्राथमिक क्रेडिट कार्डवर लागू आहे आणि ॲड-ऑन क्रेडिट कार्डवर नाही

- सदर ऑफरचा लाभ मिळवण्याच्या उद्देशाने किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव कोणतीही फसवणूक करणारी कृती केल्याचे आढळल्यास, ॲक्सिस बँकेकडे वापरकर्त्याला या ऑफरच्या लाभांपासून अपात्र ठरवण्याचे अधिकार राखीव आहेत. सदर ऑफरचा लाभ मिळवण्याच्या उद्देशाने कोणताही गैरप्रकार किंवा फसवणूक केल्याचे आढळल्यास, बँकेद्वारे आवश्यक कायदेशीर कारवाई केली जाईल. कृपया नोंद घ्यावी की, या संदर्भातील बँकेचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहील.

- ज्या वापरकर्त्यांचे खाते ऑफरच्या कालावधीपूर्वी किंवा ऑफर दरम्यान थकीत म्हणून वर्गीकृत केले गेले आहे, असे वापरकर्ते या ऑफरच्या लाभांसाठी पात्र नसतील. या बाबतीत बँकेचा विवेकाधिकार अंतिम राहील.

- येथे समाविष्ट असलेल्या अटी आणि शर्तींमधील कोणत्याही त्रुटी आणि/किंवा चुकांसाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही. सर्व माहिती कोणत्याही प्रकारच्या हमीशिवाय 'जशी आहे तशी' या तत्त्वावर प्रदान केली गेली आहे. ॲक्सिस बँक वापरकर्ता/वापरकर्ते आणि/किंवा कोणत्याही तृतीय पक्षास कोणत्याही प्रकारची हमी देत नाही तसेच कोणत्याही प्रकारच्या स्पष्ट किंवा अप्रत्यक्ष हमींचा, ज्यामध्ये माहितीची अचूकता, वेळेत उपलब्धता, पूर्णता, व्यापारीयोग्यता किंवा विशिष्ट उद्देशासाठी उपयुक्तता यांचा समावेश आहे परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही, स्पष्टपणे अस्वीकार करते.

- कंपनीच्या प्रणालीची सुरक्षा, सुरक्षितता आणि अखंडता तसेच तिचे ग्राहक आणि वापरकर्त्यांचे हितसंबंध सुरक्षित राहतील याची खात्री करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलण्याचा अधिकार ॲक्सिस बँक/व्हर्नोस्ट राखून ठेवते. या उद्देशासाठी, तुम्ही नोंदवलेल्या ऑर्डरची सत्यता, अंमलबजावणीयोग्यता आणि वैधता पडताळण्यासाठी व निश्चित करण्यासाठी व्हर्नोस्ट विविध पावले उचलू शकते.

- ग्रॅब डील्सकडे कोणत्याही वेळी सदस्याला पूर्वसूचना न देता नवीन उत्पादने सादर करण्याचा आणि विद्यमान उत्पादने बदलण्याचा अधिकार राखीव आहे.

- ही ऑफर इतर कोणत्याही (विद्यमान किंवा नवीन) सवलतींसोबत एकत्रितपणे वापरायची की नाही, याचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार बँकेकडे असेल. या ऑफरसह असे कोणतेही कॅशबॅक/रिवॉर्ड पॉईंट्स/सवलत जोडण्याचा किंवा हटवण्याचा अधिकार ॲक्सिस बँककडे राखीव आहे.

- वापरकर्ता याद्वारे ॲक्सिस बँकेला कोणत्याही नुकसानीसाठी क्षतिपूर्ती देण्यास आणि ती सुरक्षित ठेवण्यास सहमत आहे, जी या ऑफरच्या संदर्भात बँकेला सोसावी लागू शकते; यामध्ये फसवणुकीचे आणि/किंवा बेकायदेशीर व्यवहार किंवा या ऑफरमध्ये सहभागी होताना वापरकर्त्याने केलेले चुकीचे सादरीकरण यांमुळे

होणाऱ्या नुकसानीचा मर्यादेशिवाय समावेश आहे

- ऑफरशी संबंधित कोणत्याही जाहिरात किंवा प्रचार साहित्यामधील सूचना व अटींमध्ये कोणताही मतभेद किंवा विसंगती आढळल्यास, या अटी व शर्ती अशा सर्व इतर सूचना व अटींवर प्राधान्याने लागू राहतील; तसेच ॲक्सिस बँकेकडून कोणत्याही टप्प्यावर आपल्या हक्कांची अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्यास, त्याचा अर्थ त्या हक्कांचा त्याग झाल्याचे मानले जाणार नाही.

*कॅशबॅक अटी व शर्ती केवळ किरकोळ/बचत खातेधारकांसाठी लागू.

**ॲक्सिस बँक प्रमाणित अटी आणि शर्ती:**

- सवलतीसंदर्भातील वापरकर्त्यांच्या सर्व शंका/तक्रारी भागीदार संस्थेच्या अटी व शर्ती आणि तक्रार निवारण धोरणानुसार संबंधित भागीदाराकडेच मांडल्या जाव्यात
- सदर ऑफरबाबतच्या वापरकर्त्यांच्या सर्व शंका किंवा विवाद ऑफर कालावधी दरम्यान किंवा प्रमोशन कालावधी संपल्यापासून 90 दिवसांच्या आत मांडले जावेत. कोणत्याही विवादाच्या किंवा तक्रारीच्या प्रसंगी, प्रकरणाची पुढील चौकशी करण्यासाठी वापरकर्त्याने इनव्हॉइसची स्कॅन केलेली प्रत सादर करणे आवश्यक आहे. ॲक्सिस बँकेद्वारे या ऑफरच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या कॅशबॅक, रिवॉर्ड पॉइंट्स किंवा B2B सवलतींशी संबंधित कोणत्याही शंकांसाठी, वापरकर्त्याने ॲक्सिस बँकेच्या कॉल सेंटरशी संपर्क साधावा: 1800- 209-5577.
- सदर ऑफर हस्तांतरणीय नाही, त्याबाबत वाटाघाटी करता येणार नाहीत आणि तिचे रोख रकमेत रूपांतर करता येणार नाही.
- अपूर्ण/नाकारलेले/अवैध/परत केलेले/विवादित किंवा अनधिकृत/फसवणुकीचे व्यवहार ऑफरसाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.
- जर ऑफर कॉन्फिगर केली नसेल किंवा कोणत्याही टेलिफोन नेटवर्क किंवा लाईन खराब असल्यास, विलंब झाल्यास, ट्रॅफिक गोंधळ, कॉम्प्युटर ऑन-लाईन सिस्टीम, सर्व्हर किंवा प्रदाता, संगणक उपकरण, सॉफ्टवेअर किंवा वेबसाईटमुळे प्राप्त होऊ शकले नसेल तर ॲक्सिस बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.
- ऑफरमध्ये सहभाग पूर्णपणे स्वैच्छिक आहे आणि हे गृहीत धरले जाते, की कार्डधारकांचा सहभाग हा ऐच्छिक तत्त्वावर आधारित असल्याचे मानले जाईल.
- ॲक्सिस बँक कोणतीही कारणे न देता किंवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय ऑफरसाठी लागू असलेल्या सर्व किंवा कोणत्याही अटी सुधारित/बदलण्याचा अधिकार राखून ठेवते. कोणतीही कारणे न देता किंवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय ऑफर बंद करण्याचा अधिकार ॲक्सिस बँककडे राखीव आहे.
- कोणत्याही कार्डधारकाच्या ऑफर किंवा पात्रतेशी संबंधित कोणतेही विवाद किंवा विसंगतीसह ऑफरशी संबंधित सर्व बाबींच्या बाबतीत, ॲक्सिस बँकेचा निर्णय अंतिम आणि सर्व बाबतीत कार्डधारकांवर बंधनकारक असेल.
- प्रचारात्मक साहित्यामध्ये दिलेली चित्रे केवळ चित्रमय सादरीकरणासाठी आहेत आणि ॲक्सिस बँक त्याबाबत कोणतेही दायित्व किंवा जबाबदारी स्वीकारत नाही. सदर ऑफर म्हणजे मर्चंट/संलग्न संस्था किंवा कोणत्याही तृतीय पक्षाची उत्पादने/सेवा खरेदी करण्यासाठीचा सल्ला, आमंत्रण किंवा प्रलोभन नाही आणि असे मानलेही जाणार नाही; तसेच यातून कोणतेही कायदेशीर अधिकार किंवा बंधने निर्माण करण्याचा उद्देश नाही.
- ॲक्सिस बँकेची ही ऑफर लागू असलेले कायदे आणि नियामक मार्गदर्शक तत्त्वे/नियमांनुसार तसेच वेळोवेळी बदलणाऱ्या बँकेच्या विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनुसार असेल.
- बँक उत्पादनांच्या विक्री/विपणनासाठी एजंटच्या सेवा वापरू शकते. ॲक्सिस बँक लिमिटेडचे कॉपी राईट्स. सर्व हक्क राखीव आहेत.
- ऑफर अंतर्गत कार्ड धारकाने घेतलेल्या कोणत्याही वस्तू/सेवांच्या वापरामुळे किंवा अन्यथा उद्भवणाऱ्या

कोणत्याही नुकसान/हानी/दाव्यासाठी ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

- ऑफर अंतर्गत वस्तू आणि/किंवा सेवांच्या वितरणामध्ये होऊ शकणाऱ्या कोणत्याही विलंबासाठी किंवा नुकसानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही.
- प्रमोशन कालावधीदरम्यान कोणत्याही वेळी ऑफर बदलण्याचा किंवा बंद करण्याचा ॲक्सिस बँककडे अधिकार आहे. ऑफरच्या संदर्भात ॲक्सिस बँकेचा निर्णय अंतिम आणि वापरकर्त्यावर बंधनकारक असेल आणि या संदर्भात कोणतेही पत्रव्यवहार स्वीकारले जाणार नाही.
- जर ऑफर अंतर्गत किंवा अन्यथा कार्डच्या वापराद्वारे लाभ प्राप्त करण्याच्या उद्देशाने कोणतीही फसवणूक कृती केली जात असल्याचे आढळले तर ऑफरच्या लाभांपासून कोणत्याही कार्डधारकाला अपात्र ठरविण्याचा अधिकार ॲक्सिस बँक राखून ठेवते.
- या ऑफरअंतर्गत मिळणाऱ्या लाभांशी संबंधित सर्व कर, शुल्क, उपकर किंवा इतर वैधानिक देय रक्कम आणि आकार यांचा संपूर्ण भार केवळ कार्डधारकाने सहन करावा लागेल
- अशा कोणत्याही कर, शुल्क, उपकर किंवा इतर वैधानिक देय रकमेसाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.
- या ऑफरला लागू असलेल्या अटी व शर्ती या ॲक्सिस बँकेद्वारे जारी करण्यात आलेल्या क्रेडिट कार्ड / डेबिट कार्डसाठी लागू असलेल्या मुख्य अटी व शर्तींच्या अतिरिक्त असतील आणि त्यांचा पर्याय म्हणून किंवा त्यांच्याशी विसंगत स्वरूपात लागू होणार नाहीत
- सदर ऑफर जिथे प्रतिबंधित आहे तिथे, आणि ज्या उत्पादनांसाठी/सेवांसाठी अशा प्रकारचे कार्यक्रम कोणत्याही कारणास्तव उपलब्ध करून दिले जाऊ शकत नाहीत, तिथे लागू होणार नाही.
- या ऑफरचा लाभ घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने या अटी आणि शर्ती वाचल्या आहेत, समजून घेतल्या आहेत आणि स्वीकारल्या आहेत असे मानले जाईल.
- ऑफर किंवा अटी व शर्तींशी संबंधित कोणतेही विवाद केवळ मुंबईतील न्यायालयांच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन असेल.
- या कॅम्पेन/ऑफरमध्ये सहभागी होणाऱ्या कोणत्याही वापरकर्त्याने या अटी व शर्ती वाचल्या, समजून घेतल्या आणि स्वीकारल्या आहेत असे गृहीत धरले जाईल.

- ऑफरमध्ये सहभाग पूर्णपणे स्वैच्छिक आहे आणि हे समजले जाते, की वापरकर्त्याद्वारे सहभाग पूर्णपणे स्वैच्छिक आधारावर केला गेला असल्याचे मानले जाईल.
- सुसंगत नसलेले मोबाईल फोन हँडसेट्स, दूरसंचार वापर योजना, नेटवर्क अपयश, प्रणालीतील बिघाड/त्रुटी किंवा कोणत्याही इतर कारणांमुळे वापरकर्ता/वापरकर्ते व्यवहार करण्यास असमर्थ ठरल्यास किंवा व्यवहार करण्यात अपयशी ठरल्यास, त्याबाबत ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
- ॲक्सिस बँक कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय आणि वेळोवेळी या ऑफरला मागे घेण्याचा/निलंबित करण्याचा/सुधारित करण्याचा/रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवते.
- जर ऑफर कॉन्फिगर केली नसेल किंवा कोणत्याही टेलिफोन नेटवर्क किंवा लाईन, संगणक ऑनलाईन सिस्टीम, सर्व्हर किंवा प्रदाते, मोबाईल हँडसेट, संगणक उपकरण, सॉफ्टवेअर किंवा वेबसाईटवर बिघाड, विलंब, ट्रॅफिक/कंजेशनमुळे प्राप्त होऊ शकले नसेल तर ॲक्सिस बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही. या तांत्रिक कारणांमुळे उद्भवणाऱ्या ॲक्सिस बँककडून कोणतेही नुकसान, खर्च किंवा हानीचा वापरकर्ता दावा करू शकत नाही.
- केवळ त्या व्यवहारांवरच ऑफर लागू होईल ज्यांचे यशस्वीरीत्या ट्रॅकिंग आणि पडताळणी संलग्न भागीदाराद्वारे केली गेली आहे; ॲक्सिस बँक या प्रक्रियेसाठी कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही.

- या ऑफरअंतर्गत मिळणाऱ्या लाभांशी संबंधित सर्व कर, शुल्क, उपकर किंवा इतर वैधानिक देय रक्कम आणि आकार यांचा संपूर्ण भार केवळ खातेदाराने सहन करावा लागेल; ॲक्सिस बँक अशा कोणत्याही कर, शुल्क किंवा वैधानिक देय रकमेसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.
- अपूर्ण/नाकारलेले/अवैध/परत केलेले/विवादित किंवा अनधिकृत/फसवणूकीचे रिचार्ज किंवा व्यवहार ऑफरसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.
- या अटी व शर्ती भारताच्या कायद्यांद्वारे नियंत्रित केल्या जातील. ऑफरशी संबंधित सर्व विषयांच्या संदर्भात कोणत्याही विवादांच्या संदर्भात मुंबईतील न्यायालयांकडे विशेष अधिकारक्षेत्र असेल.
- ऑफर आणि या अटी व शर्ती वेळोवेळी जारी केलेल्या लागू आरबीआय मार्गदर्शक तत्वांच्या आणि प्रचलित कायदे आणि नियमनांच्या अधीन आहेत. सदर ऑफर कोणत्याही वेळी प्रचलित कायदा / नियमांच्या आधारावर सुधारित किंवा बंद केली जाऊ शकते आणि जोपर्यंत प्रचलित / सुधारित कायद्यानुसार दोन्ही पक्षांकडून अटींमध्ये बदल केला जात नाही, तोपर्यंत ही ऑफर चालू ठेवण्यासाठी कोणताही पक्ष जबाबदार किंवा बांधील असणार नाही. जर प्रचलित कायद्याचे पूर्ण पालन केल्याशिवाय ही ऑफर कोणत्याही वेळी सुरू ठेवणे शक्य नसेल, तर ज्या तारखेपासून या ऑफरवर निर्बंध घालणारा किंवा प्रतिबंध करणारा सुधारित कायदा अंमलात येईल, त्या तारखेपासून ही ऑफर संपुष्टात आली आहे असे मानले जाईल.
- येथे नमूद केलेल्या सर्व किंवा कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये, कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्वसूचना/नोटीस न देता, स्वतःच्या निर्णयानुसार बदल किंवा सुधारणा करण्याचा अधिकार ॲक्सिस बँकेने राखून ठेवला आहे. कोणतीही कारणे न देता किंवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय ऑफर बंद करण्याचा अधिकार ॲक्सिस बँककडे राखीव आहे. सदर ऑफर मागे घेतल्यामुळे, तिच्या अटी आणि शर्तींमध्ये बदल केल्यामुळे किंवा ऑफर बंद केल्यामुळे उद्भवू शकणाऱ्या कोणत्याही हानी/ नुकसान/ दावा किंवा दुखापतीसाठी ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.
- ज्याठिकाणी प्रतिबंधित असेल तेथे आणि/किंवा अशा उत्पादने/सेवांवर ऑफर उपलब्ध नाही ज्यासाठी अशा ऑफर कोणत्याही कारणास्तव उपलब्ध करू शकत नाहीत. ज्याठिकाणी कायद्याने प्रतिबंधित असेल तेथे ऑफर रद्द आहे.

**अस्वीकृती**

ग्रॅब डील्स  हे केवळ व्यापारी/B2B भागीदारांद्वारे ॲक्सिस बँकेच्या ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या ऑफर्स/सवलती प्रदर्शित करण्याचे एक प्लॅटफॉर्म आहे आणि ॲक्सिस बँक यापैकी कोणत्याही उत्पादनांची/सेवांची विक्री किंवा तरतूद करत नाही. ग्राहकांच्या संदर्भात बँक ही व्यापारी/उत्पादनांचे मालक यांच्या स्पष्ट किंवा अप्रत्यक्ष प्रतिनिधी म्हणून कार्य करत नाही.

ॲक्सिस बँक, व्यापारी/ B2B भागीदाराद्वारे देण्यात आलेल्या ऑफर्सच्या बाबतीत कोणतीही हमी देत नाही किंवा त्याबाबत कोणतेही सादरीकरण/प्रतिज्ञा करत नाही. ऑफर अंतर्गत उत्पादने/सेवांच्या विक्री/गुणवत्ता/वैशिष्ट्यांसाठी ॲक्सिस बँक जबाबदार नाही.

ग्राहक येथून पुढे गेल्यास, कोणत्याही उत्पादनाची/सेवेची खरेदी केवळ ॲक्सिस बँकेचे क्रेडिट/डेबिट कार्ड/ नेट बँकिंग सुविधा/निओ फॉर बिझनेस याद्वारेच करणे अनिवार्य असेल. व्यापारी/ B2B भागीदाराद्वारे ऑफर केलेली उत्पादने/सेवा इतर दूकानात किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर देखील उपलब्ध असू शकतात. या संदर्भात ग्राहकाने विवेकबुद्धी राखण्याचा सल्ला दिला जातो.